रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

वर्ष १७ ◆ अंक ३४७
www.ramprahar.com

शुक्रवार ४ जुलै २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

पाच महिने गुंगारा देणाऱ्या आरोपीला हरियाणातून अटक/२

श्रीवर्धन समुद्र किनाऱ्याला मोठ्या उधाणाचा फटका/५

वैभव सूर्यवंशीची इंग्लंडमध्ये पुन्हा विस्फोटक खेळी/८

## वडेट्टीवारांचा दावा रायगडच्या एसपींनी फेटाळला

**अलिबाग :** काँग्रेस नेते आणि आमदार विजय वडेट्टीवार यांनी रायगड जिल्ह्यात एका दिवशी सहा



बलात्कार झाल्याचा दावा पावसाळी अधिवेशनादरम्यान सभागृहाबाहेर पत्रकारांशी संवाद साधताना उपस्थित होता, मात्र हा दावा रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी फेटाळला आहे. तळा तालुक्यात एका आदिवासी पाड्यावर आशा वर्कर्सनी घेतलेल्या आरोग्य शिबिरात काही किशोरवयीन मुली गर्भवती असल्याचे आढळून आले होते, मात्र त्या वेगवेगळ्या काळातील गर्भवती असून त्यांचे विवाह संबंधित जोडीदाराशी आधीच झालेले आहेत. या प्रकरणात तळा पोलीस ठाण्यात गुन्हादेखील दाखल झाला आहे. आदिवासी समाजाची इच्छा नसतानाही एक पॉझिटिव्ह दृष्टिकोन म्हणून आपण हा गुन्हा नोंद केला असून एका दिवसात सहा बलात्कार ही माहिती चुकीची असल्याचे एसपी आंचल दलाल यांनी स्पष्ट केले आहे.

# अलिबाग-वडखळ महामार्गाला निधी

## डांबरीकरणासाठी २२ कोटी मंजूर; चौपदरीकरणासाठीही हालचाली सुरू

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग-वडखळ राष्ट्रीय महामार्गाच्या डांबरीकरणासाठी २२ कोटी १४ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्याचबरोबर या महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी हालचाली पुन्हा सुरू झाल्या आहेत. त्यामुळे अलिबागला येणाऱ्या पर्यटकांची तसेच स्थानिकांची नेहमीच्या वाहतूक कोंडीतून सुटका होणार आहे.

विधीमंडळात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या दालनात या संदर्भात बैठक झाली. या बैठकीला राज्याचे सार्वजनिक बांधकामंत्री शिवेंद्रराजे भोसले, आमदार महेंद्र दळवी, आमदार महेश बालदी, माजी आमदार सुभाष उर्फ पंडित पाटील, जि.प.चे माजी उपाध्यक्ष आस्वाद पाटील आदी उपस्थित होते.



अलिबाग-वडखळ महामार्गावर ठिकठिकाणी खड्डे पडल्याने वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. त्यामुळे रस्त्याची तातडीने दुरूस्ती करा आणि चौपदरीकरणासाठी फेरप्रस्ताव सादर करा, असे निर्देश या वेळी सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाला दिले.

केंद्र सरकारच्या रस्ते व परिवहन राज्य मंत्रालयाने यंदाच्या वार्षिक कार्यक्रमात या रस्त्याच्या दुरूस्ती कामाला प्रशासकीय आणि तांत्रिक मंजुरी दिली असून निविदा प्रक्रियाही पूर्ण झाली आहे. २२ कोटी १९ लाख रुपयांना या कामाचा ठेका देवकर अर्थमुव्हर्स कंपनीला देण्यात आला आहे. पावसाळ्यानंतर डांबरीकरणाची प्रक्रिया सुरू होणार असल्याचे या वेळी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले, तर पावसाळ्यातील खड्डे भरण्यासाठी २८ लाख रुपयांचा निधीही उपलब्ध करून देण्यात आला असून निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. खड्डे भरणे आणि रस्ता दुरूस्तीची कामे लवकरच सुरू होणार आहेत. त्यामुळे अलिबाग-वडखळ महामार्गाचा प्रश्न लवकरच मार्गी लागण्याची चिन्हे दिसत आहेत.

याबाबत आमदार महेंद्र दळवी यांनी सांगितले की, महामार्गाच्या डांबरीकरणाला पावसाळ्यानंतर सुरुवात होणार आहे. चौपदरीकरणालाही मंजुरी मिळावी यासाठी येत्या शनिवारी दिल्लीत आम्ही केंद्रीय भूपृष्ठ वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांची भेट घेणार आहोत. हे काम तातडीने मार्गी लागावे यासाठी विधानसभा अध्यक्ष नार्वेकर, मंत्री शिवेंद्रराजे भोसले हेही प्रयत्नशील आहेत.

## बांधकाम पूर्ण झालेली प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र कार्यान्वित करा

### आमदार प्रशांत ठाकूर यांची विधीमंडळ अधिवेशनात मागणी

### लवकरच सर्व आरोग्य केंद्र कार्यान्वित करणार : आरोग्यमंत्री आबिटकर

**पनवेल, मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्यातील बांधकाम पूर्ण झालेली प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र कार्यान्वित करण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून शासनाकडे केली. त्या अनुषंगाने लवकरच सर्व आरोग्य केंद्र कार्यान्वित करण्याचे आश्वासन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री प्रकाश आबिटकर यांनी लेखी दिले.




राज्यात सन २०२१ ते सन २०२५ या कालावधीत ४१६ प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्रांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून सद्यःस्थितीत त्यातील २१३ केंद्र अद्याप सुरू झाली नसल्याचे मे २०२५मध्ये निदर्शनास आले आहे. या केंद्रांना आवश्यक असलेले फर्निचर, वीज जोडणी यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध नसणे, काही ठिकाणी उद्घाटन कोण करणार असे प्रश्न निर्माण होणे तसेच आरोग्य कर्मचारी नेमण्यासाठी निधी देण्यात येत नसणे इ. कारणास्तव ही केंद्र अद्याप सुरू करण्यात आली नसल्याने रुग्णांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे या प्रकरणी शासनाने चौकशी करून त्या अनुषंगाने प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांना मूलभूत सुविधांसाठी तत्काळ निधी वितरित करून ही विनावापर असलेली केंद्र तातडीने कार्यान्वित करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुंबई येथे सुरू असलेल्या विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात दाखल केला होता. **(पान २ वर..)**

## शाळांच्या दुरूस्ती, देखभालीसाठी निधीची कार्यवाही सुरू -शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे

राज्यातील शासकीय, जिल्हा परिषद शाळांच्या देखभाल व दुरूस्तीसाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी तारांकित प्रश्नाद्वारे करत या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष केंद्रित केले. यावर शाळांच्या दुरूस्ती कामांना जिल्हा वार्षिक योजना, समग्र शिक्षा अभियान व अन्य योजनांच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे, असे लेखी उत्तर शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी दिले आहे.

राज्यातील विशेषतः सिंधुदुर्ग, बीड, हिंगोली, अलिबाग (जि. रायगड), नागपूर, नाशिक, अमरावती, परभणीसह अनेक जिल्ह्यांतील शासकीय व जिल्हा परिषद शाळांपैकी अनेक शाळा मोडकळीस आल्याचे, वर्गखोल्या पडण्याचे, छताला गळती लागण्याच्या व संरक्षक भिंती जमीनदोस्त झाल्याची घटना मे २०२५मध्ये निदर्शनास आली असून अद्यापही उक्त जिल्ह्यांमध्ये निधी उपलब्ध न झाल्यामुळे पायाभूत सुविधांची कामे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे. शाळांच्या जीर्ण अवस्थेमुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण धोक्यात असल्याचे विविध जिल्ह्यांतील पाहणीत व स्थानिक लोकप्रतिनिधींच्या लेखी तक्रारींमध्ये नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे चौकशीच्या अनुषंगाने शाळांच्या देखभाल व दुरूस्ती करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुंबई येथे सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात दाखल केला होता. **(पान २ वर..)**

## पंतप्रधान मोदींना घानाकडून सर्वोच्च नागरी सन्मान

### २१ तोफांच्या सलामीसह 'गार्ड ऑफ ऑनर'

**अक्रा (घाना) : वृत्तसंस्था**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे दोन दिवसीय घाना देशाच्या दौऱ्यावर गेले असून त्यांना तेथील राष्ट्रपती महामा यांनी घानाचा सर्वोच्च नागरी सन्मान देऊन गौरविले आहे. तत्पूर्वी विमानतळावर त्यांना २१



तोफांच्या सलामीसह 'गार्ड ऑफ ऑनर' प्रतिष्ठापूर्वक देण्यात आला.

याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घाना सरकारचे आभार मानले तसेच याबाबतची माहिती त्यांनी आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवरून शेअर केली आहे.

घानाची राजधानी अक्रा येथे भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे घानाचे राष्ट्रपती जॉन ड्रामानी महामा यांनी जंगी स्वागत केले. त्याचबरोबर पीएम मोदींना देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान 'द ऑफिसर ऑफ द ऑर्डर ऑफ द स्टार ऑफ घाना' देऊन सन्मानित केले.

## 'एचएसआरपी'साठी १५ ऑगस्ट अंतिम मुदत

**मुंबई :** शासनाने १ एप्रिल २०१९पूर्वीच्या नोंदणीकृत वाहनांसाठी उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक (एचएसआरपी) पाटी बसविणे बंधनकारक केले आहे. अशा वाहनांना यापूर्वी ३० जून २०२५पर्यंत मुदत देण्यात आली होती, मात्र वाहनधारकांकडून अल्प प्रतिसाद मिळाल्याने ही अंतिम मुदत १५ ऑगस्ट २०२५पर्यंत वाढविण्यात आली आहे. वाहनधारकांनी परिवहन विभागाच्या http://transport.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाऊन एचएसआरपी पाटीसाठी वेळ घेणे आवश्यक आहे.

## निवडक

### बालीकडे निघालेली बोट बुडाली; चौघांचा मृत्यू, ३८ जण बेपत्ता

**बाली :** इंडोनेशियाच्या जावा बेटावरून बालीकडे निघालेली एक फेरीबोट बुधवारी मध्यरात्रीच्या सुमारास समुद्रात बुडाली. या दुर्घटनेत किमान चार प्रवाशांचा मृत्यू झाला असून ३८ जण अद्यापही बेपत्ता आहेत, तर आतापर्यंत २३ जणांना वाचवण्यात यश आले आहे. बोट बुडण्याचे कारण वाईट हवामान असल्याचे सांगण्यात आले आहे. बचाव व शोधकार्य सुरू आहे.

### शुबमन गिलने इंग्लंडमध्ये ठोकले विक्रमी द्विशतक

**बर्मिंगहॅम :** इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी



सामन्यात भारतीय संघाचा नवा कर्णधार शुबमन गिलने नवा इतिहास रचला आहे. बर्मिंगहॅम कसोटी सामन्यातील पहिल्या डावात त्याने द्विशतक झळकावले. इंग्लंडच्या मैदानात लिटल मास्टर सुनील गावसकर आणि राहुल द्रविड यांच्यानंतर द्विशतक झळकवणारा तो भारताचा तिसरा फलंदाज ठरला आहे. याआधी पहिल्या कसोटी सामन्यात त्याने शतकी खेळी केली होती. **(सविस्तर वृत्त पान ८ वर..)**

## जीवनगौरव...




**मुंबई : अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने दरवर्षी पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पत्रकारांना विविध पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येते. सन २०२४च्या पुरस्कारांचे वितरण मुंबई मराठी पत्रकार संघाच्या पत्रकार भवनात बुधवारी संध्याकाळी झाले. या सोहळ्यात ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांना आचार्य बाळशास्त्री जांभेकर जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या सोहळ्याला माजी केंद्रीय मंत्री तथा खासदार शरद पवार, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ विचारवंत अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव, सुप्रसिद्ध मराठी सिनेअभिनेते भरत जाधव, कामगार नेते महेंद्र घरत आदी उपस्थित होते.** (वृत्त पान ३ वर..)

## सिंधुदुर्गात मुसळधार पाऊस; कुडाळ शहरात शिरले पाणी

**कुडाळ : प्रतिनिधी**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात बुधवारी रात्रीपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने गंभीर परिस्थिती निर्माण केली आहे. सह्याद्री पट्ट्यातील जोरदार पावसामुळे नद्या आणि नाल्यांना पूर आला असून भंगसाळ नदीचे पाणी कुडाळ शहरात घुसल्याने शहरात जाणारा मार्ग बंद झाला आहे. याशिवाय मुंबई-गोवा महामार्गाच्या नजीकच्या पावशी आणि वेताळ बांबर्डे या गावांमध्येही पुरस्थिती निर्माण झाली आहे.



कुडाळ तालुक्यातील माणगाव खोऱ्यात रात्रभर मुसळधार पाऊस झाल्याने नद्या-नाल्यांना मोठ्या प्रमाणात पूर आला आहे. त्यामुळे कुडाळ शहरात पुराची परिस्थिती निर्माण झाली आहे. भंगसाळ नदीच्या पुरामुळे परिसरातील गावांमध्ये पाणी शिरले असून आपत्कालीन यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. स्थानिक प्रशासनाने सतर्कतेचा इशारा जारी केला आहे.

जिल्ह्यातील वाढती पुरस्थिती लक्षात घेता आपत्कालीन यंत्रणा सज्ज झाल्या असून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. रस्ते आणि वाहतूक व्यवस्थापनासाठी पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पावसाचा जोर कायम राहिल्यास परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. नागरिकांनी स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे आणि सुरक्षित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## थोरा-मोठ्यांकडून प्रेरणा घेऊन यशस्वी व्हा -लोकनेते रामशेठ ठाकूर

### गव्हाण विद्यालयात विद्यार्थ्यांना मोफत वह्यावाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जिद्द आणि चिकटीच्या जोरावर आम्ही सर्वजण आयुष्यामध्ये यशस्वी होऊ शकलो. तुम्हीही थोरा-मोठ्यांच्या जीवनप्रवासातून प्रेरणा घेऊन यशस्वी व्हा, असे आवाहन रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे ज्येष्ठ सदस्य, माजी खासदार लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना केले.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि भारतीय जनता पक्ष उलवे नोड-२ यांच्या वतीने 'रयत'च्या गव्हाण येथील येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये मोफत वह्या वाटपाचा कार्यक्रम बुधवारी (दि. २) आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर बोलत



(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

होते. त्यांनी मंचावर उपस्थित असणाऱ्या विद्यालयाच्या सर्व माजी विद्यार्थ्यांनी केलेल्या प्रगतीपासून विद्यार्थ्यांनी स्फूर्ती घ्यावी, असे आवर्जून सांगितले.

या समारंभास रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य जे.एम. म्हात्रे, वाय.टी. देशमुख, महेंद्र घरत, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष, गव्हाण विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन तथा 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यालयाच्या नवनिर्वाचित प्राचार्य तसेच 'रयत'च्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य ज्योत्स्ना ठाकूर यांनी प्रास्ताविकात गव्हाण विद्यालयाच्या वाटचालीबद्दल माहिती देत लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यालयासाठी केलेल्या विकासात्मक कामांची सविस्तर माहिती दिली आणि त्यांना धन्यवाद दिले. **(पान २ वर..)**

### संपूर्ण शाळा होणार डिजिटल!

विद्यालयाच्या भौतिक सुविधांसाठी सदैव मदतीचा हात देणारे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यालयाच्या सर्व विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरून गुणवत्ताधारक व्हावे यासाठी याआधी गतवर्षी विद्यालयास १५ लाख रुपयांच्या देणगीतून १५ इंटरॲक्टिव्ह पॅनेल दिले आहेत. उर्वरित वर्गखोल्यांसाठीदेखील नऊ लाख रुपयांचे नवीन नऊ इंटरॲक्टिव्ह पॅनल बसवून देण्याचे या वेळी बोलताना त्यांनी जाहीर केले.

## काशीद समुद्रात बुडालेल्या युवकाचा मृतदेह सापडला

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील काशीद येथील समुद्रात बुडालेल्या तनिष्क मल्होत्रा (वय २०, रा. बावधन, ता. हवेली, जि. पुणे) याचा मृतदेह तब्बल ४८ तासानंतर किनारी सापडला आहे. दोन दिवस त्याचा शोध सुरू होता.

तनिष्क मल्होत्रा हा डिप्लोमा इंजिनिअरिंगच्या शेवटच्या वर्षात शिकणारा युवक तीन मित्रांसह काशीद येथे पर्यटनासाठी आला होता. चारही युवक १ जुलै रोजी समुद्रात पोहण्यास उतरले असता तनिष्क हा बुडाला. सहकाऱ्यांनी याची कल्पना स्थानिकांना दिली.

मुरूड पोलिसांनी थर्मल ड्रोण तसेच कोस्टल गार्डचे हेलिकॉप्टर व अन्य तत्सम मदत घेऊन शोधकार्य सुरू होते. अखेर गुरुवारी (दि. ३) तनिष्कचा मृतदेह काशीद समुद्र किनारी आढळून आला. शवविच्छेदनासाठी मुरूड ग्रामीण रुग्णालयात मृतदेह नेण्यात आला. तनिष्कच्या आकस्मित मृत्यूमुळे मल्होत्रा कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# ‘शाळाबाह्य विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न’

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्य शासन विद्यार्थ्यांची घटती पटसंख्या, शाळाबाह्य विद्यार्थी आणि शिक्षणाच्या गुणवत्तेसंदर्भात गंभीर असून सर्वंकष उपाययोजना राबवत आहे. यु-डायस (UDISE) प्रणालीच्या आकडेवारीनुसार विद्यार्थ्यांची संख्या काहीशी घसरलेली असली तरी त्यामागील कारणे समजून घेऊन योग्य ती कार्यवाही केली जात आहे, असे शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी विधानपरिषदेत सांगितले. नियम ९२ अन्वये अर्धातास चर्चेला उत्तर देतं मंत्री भुसे बोलत होते.



मंत्री भुसे म्हणाले की, अनेक विद्यार्थी दहावी नंतर आयटीआय, डिप्लोमा आदी अभ्यासक्रमांकडे वळतात. मात्र, त्यांच्या शाळेतील रेकॉर्ड अद्ययावत होत नसल्यामुळे ते ’ड्रॉपआउट’ म्हणून नोंदविले जातात. राज्यात शाळाबाह्य विद्यार्थ्यांना पुन्हा मुख्य प्रवाहात आणण्यासाठी १ ते १५ जुलै दरम्यान विशेष मोहिम राबवली जात आहे. आधार लिंकिंग आणि अपार आयडी (विद्यार्थ्यांसाठी युनिक कोड) यामार्फत प्रत्येक विद्यार्थ्याचा शिक्षण प्रवास ट्रॅक केला जाणार आहे. सध्या राज्यात ८६% विद्यार्थ्यांचा डेटा संकलित झालेला असून ९५% आधार लिंकिंग पूर्ण झाले असल्याचेही मंत्री भुसे यांनी सांगितले.

मंत्री भुसे म्हणाले की, शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण, विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके, गणवेश, पोषण आहार, स्वच्छ शाळा, शुद्ध पिण्याचे पाणी, शौचालये, आणि खेळांची सुविधा यासाठी विशेष भर दिला जात आहे. आतापर्यंत ९ हजार उच्चशिक्षित शिक्षक नियुक्त झाले असून आणखी १० हजार भरती प्रक्रियेत आहेत.

मंत्री भुसे यांनी स्पष्ट केले की, कोणतीही शाळा बंद होणार नाही आणि प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्ता पूर्ण व आनंददायी शिक्षण मिळावे, हे शासनाचे उद्दिष्ट आहे. या कामात सर्व जनतेने आणि लोकप्रतिनिधींनी सहकार्य करावे, असेही आवाहन त्यांनी केले.


# खालापुरातील तीन धरणे ओव्हरफ्लो

**खोपोली : प्रतिनिधी**

मान्सूनपूर्व जोरदार कोसळलेला पाऊस आणि जून महिन्यात सरासरीपेक्षा जास्त पडलेल्या पावसाने खालापुरातील तीन धरणे शंभर टक्के भरली असल्याने पाण्याची मोठी समस्या मिटणार आहे.

लघु पाटबंधारे विभागाच्या अखत्यारीत सिंचनासाठी असलेली भिलवले, कलोते मोकाशी आणि डोणवत धरण १०० टक्के भरले आहेत. सिंचनासाठी, औद्योगिक वापरासाठी तसेच अनेक गावाच्या पेयजल योजना धरणावर अवलंबून असल्याने पाण्याची मोठी समस्या मिटणार आहे.

भिलवले धरणातील कालव्याचा फायदा चौक भागातील उन्हाळी शेती करणाऱ्या भाजीपाला पिकवणाऱ्या शेतकऱ्यांना होतो.कलोते मोकाशील धरणाचा उजवा आणि डावा कालवामुळे खालापूरचा ग्रामीण भाग तसेच शहरी भागातील पाण्याचा तसा शेतीचा पाण्याचा प्रश्न मिटणार आहे .याशिवाय कलोते मोकाशील धरणातून आंतरराष्ट्रीय दर्जाचे इमॅजिका पार्क देखील पाणी मोठ्या प्रमाणात उचलते. खोपोली पेण मार्गावर असलेले डोणवत धरणावर १४ गावच्या पाणी योजना असून या भागातील कारखान्याची दररोजची लाखो लिटर पाण्याची मागणी डोणवत धरण पूर्ण करणार आहे.



### धरणातील पाणी क्षमता

*तालुक्यात आतापर्यंत सरासरी १९०० मिलिमीटर पाऊस पडला असून गेल्या वर्षीच्या तुलनेत धरणातील पाणीसाठा प्रचंड वाढला आहे.*

**१.भिलवले धरण-धरणाची क्षमता-२.१०० दलघमी, पूर्ण संचय क्षमता पातळी-५४.३५**

**२.कलोते मोकाशी-धरणाची क्षमता-४.१९०दलघमी. पूर्ण संचय क्षमता-८१.००**

**३. डोणवत धरणाची क्षमता-३.६७० पूर्ण संचय क्षमता-६३.४०**

# रायगडात आर्थिक समावेशन योजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी -जिल्हाधिकारी किशन जावळे

**रायगड : रामप्रहर वृत्त**

भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाच्या वित्तीय सेवा विभागाच्या निर्देशानुसार रायगड जिल्ह्यात आर्थिक समावेशन योजनेच्या शिबीरांना सुरुवात झाली आहे. तळागाळातील नागरिकांपर्यंत विविध केंद्र व राज्य शासनाच्या वित्तीय योजनांचा लाभ पोहोचवण्यासाठी १ जुलै ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.



या उपक्रमाचा आढावा जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी घेतला. या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, लीड बँक मॅनेजर विजय कुलकर्णी, जिल्हा कृषी अधिकारी वंदना शिंदे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी.एस.हरळया, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रियदर्शिनी मोरे, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेणच्या, जिल्हा प्रकल्प अधिकारी तेजस्वीनी गलांडे आणि विविध बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले की, या शिबीरांच्या माध्यमातून जिल्ह्यातील सर्व नागरिकांना प्रधानमंत्री जीवन ज्योती बिमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा बिमा योजना, अटल पेन्शन योजना आणि प्रधानमंत्री जनधन योजनेचा लाभ देण्यात येणार आहे. या शिबिरांद्वारे लाभार्थ्यांची बँक खाती उघडणे, योजना अंतर्गत नोंदणी करणे तसेच आधीच बँक खाती असलेल्या लाभार्थ्यांची ‘ई-केवायसी’ करणे असे उपक्रम राबविले जाणार आहेत. उल्लेखनीय बाब म्हणजे प्रत्येक दहा वर्षांनी बँक खात्यांची ‘ई-केवायसी’ करणे आवश्यक असते. या योजनांपासून कोणीही वंचित राहू नये, यासाठी जिल्हा प्रशासनाने ग्रामपंचायती स्तरावर व्यापक जनजागृती आणि प्रभावी अंमलबजावणीवर भर दिला पाहिजे असेही त्यांनी

यावेळी उपस्थितांना सांगितले. तसेच ज्या बँकांना शिबिरांचे लक्ष देण्यात आले आहे त्यांनी ते पूर्ण करावे, त्यासाठी ग्रामपंचायत ,ग्रामसेवक, तलाठी यांचे सहकार्य घ्यावे. सर्व पात्र लाभार्थ्यांनी या शिबिरांचा लाभ घ्यावा,असे आवाहन यावेळी केले.

# पाच महिने गुंगारा देणाऱ्या आरोपीला हरियाणातून अटक

**खोपोली : प्रतिनिधी**

पाच महिन्यापूर्वी खोपोली पोलीस ठाणे हद्दीतील गुरुदास कॅफे या हॉटेलमधून ११लाख ५० हजार रोख रक्कम घेऊन फरार झालेल्या सुमित झल्लर प्रसाद पाण्डेय, (रा.ऐकोनी, जि. इलाहाबाद-उत्तरप्रदेश) याला खोपोली पोलीस पथकाने गुरुग्राम हरियाणा येथून जेरबंद केले असून त्याच्या कडून सर्व रक्कम हस्तगत करण्यात पोलिसांना यश मिळाले आहे.

सुमित पाण्डेय हा पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गालगत श्री गुरुदास कॅफे या हॉटेलमध्ये व्यवस्थापक, म्हणून काम करत होता.३ फेब्रुवारी २०२५ रोजी हॉटेलमध्ये जमा असलेली रोख रक्कम ११लाख५०हजार रुपये कॅफेचे मालक भास्कर महाबल शेट्टी, यांचेकडे देण्यासाठी घेवुन निघाला होता. परंतु मालकांकडे न जाता सुमित फरार झाला होता. आरोपी वारंवार ठिकाण बदलत होता त्यामुळे पोलीसांच्या हाती लागत नव्हता.



रायगड जिल्हयाच्या पोलीस अधीक्षक, आँचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक, अभिजित शिवथरे, उपविभागिय पोलीस अधिकारी खालापूर विक्रम कदम यांनी सदरचा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी खोपोली पोलीस निरीक्षक शितल राउत यांना सूचना दिल्या होत्या.त्यानुसार हवालदार सुजित माळी , शिपाई प्रणित कळमकर यांनी तांत्रीक पध्दतीचा वापर करुन छडा लावला.

# श्रीवर्धन बसस्थानकाला मुक्या जनावरांचा वेढा

## प्रवाशांना भीती, चालकांची कसरत

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन बसस्थानकाचा परिसर सध्या मोकाट गुरेढोरे आणि घोड्यांच्या मुक्त संचाराने त्रस्त झाला आहे. प्रवासी, विद्यार्थी आणि एसटी कर्मचारी यांना या प्राण्यांच्या मनमानी वावरामुळे मोठा त्रास सहन करावा लागतो आहे.



येथुन पहाटेचार वाजल्यापासून रात्री साडेनऊपर्यंत अनेक लांब पल्ल्याच्या व स्थानिक एसटी फेऱ्या सुरू असतात. मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी आणि नागरीक रोज बसने ये-जा करतात. मात्र बसस्थानक परिसरात मोकाट जनावरांच्या अडथळ्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे.

बसस्थानकातील प्रशस्त आवार, प्रवेशद्वार, सर्व फलाट, वाहतूक नियंत्रण कक्ष, हिरकणी कक्ष, उपहारगृह याठिकाणी अनेकदा मोकाट घोडे व गुरे आरामात वावरताना दिसतात. त्यामुळे प्रवाशांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण होतं. एसटी कर्मचारी या प्राण्यांना हुसकावण्याची धडपड करताना नेहमी दिसून येतात.

या प्राण्यांकडून बसस्थानक परिसरात केलेल्या मलमूत्रामुळे दुर्गंधी पसरते, स्वच्छता धोक्यात येते. काही वेळा प्रवाशांचा पाय प्राण्यांच्या विष्ठेवर घसरल्याची घटनाही घडली आहे.बसस्थानकातून गाड्या बाहेर काढताना चालकांना जनावरांना हटवण्याचं काम आधी करावं लागतं. त्यामुळे फलाटावर वेळेवर सुटलेली गाडी गेटपर्यंत येईपर्यंत वेळ वाया जातो.मोकाट जनावरे म्हणजे बहुतेकदा भाकड, वृद्ध, अपंग किंवा पोषणाअभावी कुपोषित गाई, बैल, घोडे असतात. त्यांच्या मालकांनी जबाबदारी झटकली असल्याने ती उपाशीबसस्थानक परिसरात अन्नपाण्याच्या शोधात फिरतात. काही तर अन्नावाचून मृत्युमुखीही पडत आहेत.

# माथेरानमध्ये ई-रिक्षावर झाड कोसळले

**माथेरान, नेरळ : प्रतिनिधी**

माथेरान शहरात झाडे पडण्याच्या घटना वाढत असून बुध.दि.२ रोजी कम्युनिटी सेंटर येथे चार्जिंग साठी उभ्या असलेल्या ई-रिक्षावर एक झाड कोसळले.यामध्ये दोन ई-रिक्षाचे मोठे नुकसान झाले असून प्रवाशांच्या सेवेसाठी ई-रिक्षा कमी पडत आहेत.

माथेरान डोंगरमाथ्यावर जोरदार पाऊस कोसळत असून सोसाट्याचा वारा देखील वाहत आहे.त्यामुळे याठिकाणी झाडे कोसळण्याच्या घटना वाढत आहेत.माथेरान कम्युनिटी सेंटर याठिकाणी ई-रिक्षा चार्जिंग स्टेशन आहे.रात्रीच्या वेळी सर्व ई-रिक्षा चार्जिंग साठी येथे उभ्या असतात.बुध. दि.२ रोजी पहाटेच्या वेळी या ठिकणी एक जुन्या झाडाची महाकाय फांदी चार्जिंग साठी उभ्या असलेल्या दोन ई-रिक्षांवर कोसळली या घटनेत प्रकाश सुतार यांची पाच क्रमांकाची व कविता बल्लाळ यांची सात क्रमांकाच्या ई-रिक्षाचे खूप मोठे नुकसान झाले आहे.पहाटेची वेळ असल्याने कोणीही विद्यार्थी,पर्यटक प्रवासी किव्हा चालक ई-रिक्षा मध्ये नसल्याने जीवितहानी टळली.



माथेरान शहरात फक्त २० ई-रिक्षा प्रायोगिक तत्त्वावर सेवा देत आहेत यामध्ये १५ ई-रिक्षा शालेय विद्यार्थ्यांसाठी तर पाच ई-रिक्षा या ठिकाणी स्थानिकांसाठी आणि पर्यटकांसाठी आहेत.यातच दरोरोज दोन ते तीन ई-रिक्षा देखभाल दुरुस्ती साठी माथेरान बाहेर आहेत आणि आता झाड पडून दोन ई-रिक्षांचे नुकसान झाले आहे.यामुळे पालिकेने प्रायोगिक तत्त्वावर घेतलेल्या ई-रिक्षा या त्याच्याजवळ तशाच उभ्या आहेत. पालिकेने या ई-रिक्षा येथे देऊन ही सेवा सुरळीत उपलब्ध करून द्यावी अशी मागणी रिक्षा संघटना सचिव सुनिल शिंदे यांनी केली आहे.

पान १ वरून

## बांधकाम पूर्ण झालेली प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र कार्यान्वित करा

नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असलेली ही केंद्र तातडीने सुरू करून गावागावात दर्जेदार आरोग्य सेवा पोहचवावी, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी या प्रश्नाच्या माध्यमातून नमूद केले.

या प्रश्नावर आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले की, सन २०२१ ते सन २०२५ या कालावधीत ४१६ प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्रांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून सद्यःस्थितीत काही केंद्र अद्याप सुरू झाली नसल्याची बाब अंशतः खरी आहे. सद्यःस्थितीत बांधकाम पूर्ण करण्यात आलेल्या २१३ उपकेंद्रांपैकी २०६ आरोग्य केंद्र कार्यान्वित झालेली असून उर्वरित आरोग्य उपकेंद्र सुरू करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. २०६ आरोग्य उपकेंद्रात आरोग्यसेवा सुरू करण्यात आली असून उर्वरित ७ आरोग्य उपकेंद्रातील फर्निचर व वीज जोडणीचे काम अंतिम टप्प्यात असून लवकरच ही आरोग्य उपकेंद्र कार्यान्वित करण्यात येतील तसेच या आरोग्य उपकेंद्रांत आरोग्यविषयक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता पुरवणी मागणीचा प्रस्ताव विधानमंडळाच्या आगामी अधिवेशनामध्ये सादर करण्यात आलेला आहे, असेही आरोग्यमंत्र्यांनी सांगितले.

## शाळांच्या दुरूस्ती, देखभालीसाठी निधीची कार्यवाही सुरू -शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे

शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले की, शासकीय/जिल्हा परिषदेच्या शाळांच्या व वर्गखोल्यांच्या मोठ्या व किरकोळ दुरूस्तीबाबत प्रस्ताव प्राप्त आहेत. त्या अनुषंगाने पायाभूत सुविधांची कामे आणि लोकप्रतिनिधींच्या लेखी तक्रारीच्या नुसार शाळांच्या दुरूस्ती कामांना जिल्हा वार्षिक योजना, समग्र शिक्षा अभियान व अन्य योजनांच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

## थोरा-मोठ्यांकडून प्रेरणा घेऊन यशस्वी व्हा -लोकनेते रामशेठ ठाकूर

वाय.टी. देशमुख, जे.एम. म्हात्रे, अरुणशेठ भगत यांनीदेखील स्वतःच्या शालेय जीवनातील विविध उदाहरणे देत शाळा व शिक्षणाचे महत्त्व सांगून विद्यार्थ्यांनी अधिक अभ्यास करावा यासाठी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, माजी पं.स. सदस्य रत्नप्रभा घरत, भाऊशेठ पाटील, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, माजी उपसरपंच विजय घरत, अमर म्हात्रे, निलेश खारकर, भाऊ भोईर, वामन म्हात्रे, हेमंत ठाकूर, भार्गव ठाकूर, किशोर पाटील, शिक्षक पालक संघाचे अध्यक्ष कुंदन मोकल, उपाध्यक्ष नामदेव ठाकूर, सुहास भगत, सुधीर ठाकूर, कमलाकर देशमुख, विनायक कोळी, सुदर्शन घरत, महेश घरत, रामदास पाटील, योगिता भगत, उषा देशमुख, मीनाक्षी पाटील, निकिता खारकर, सुजाता पाटील, अमर घरत, जयवंत देशमुख, रोशन म्हात्रे, सागर ठाकूर, गोपाळ भगत, बी.टी. कांबळे, पी.के. ठाकूर, गव्हाण विद्यालयाच्या प्राचार्य ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख संजय उगले, मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व टी.एन.घरत जुनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या मुख्याध्यापिका सायली वडवळकर, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख प्रणिता गोळे, पर्यवेक्षक अरुण जोशी तसेच संस्थेच्या फुंडे येथील ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख बाबुलाल पाटोळे, राजू खेडकर आणि गव्हाण पंचक्रोशीतील शिक्षणप्रेमी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार रवींद्र भोईर यांनी मानले.

वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा राम प्रहर

## दुखवटा

### चंद्रभागा केणी



**उरण :** मोठे भोम येथील चंद्रभागा जगन्नाथ केणी (वय ९०) यांचे वृद्धपकाळाने दिनांक २९ जून रोजी निधन झाले त्यांच्या पश्चात रमेश केणी व प्रफुल्ल केणी असे दोन पुत्र, सुना व नातवंडे असा आप्त परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी मंगळवार (दि.८) जुलै रोजी श्रीक्षेत्र चिरनेर खाडी येथे सकाळी ८.३० वाजता होईल. तर उत्तरकार्यविधी शुक्रवार (दि. ११) जुलै रोजी मोठेभोम येथील राहत्या घरी दुपारी ठीक बारा वाजता होणार असल्याची माहिती रमेश केणी, प्रफुल्ल केणी, विजय केणी, शरद केणी या सर्वांनी दिली.

### नथुराम गुगले



**माणगाव:** निळगुण गावचे सामाजिक कार्यकर्ते सुभाष गुगले यांचे पिताश्री नथुराम भागोजी गुगले यांचे बुधवार दि. २ जुलै राहते घरी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्च्यात पत्नी,दोन मुलगे,एक मुलगी,दोन सुना,जावई,नातवंडे असा परिवार आहे. कै.गुगले यांचा दशक्रिया विधी शुक्रवार दि. ११ जुलै तर उत्तरकार्य विधी रविवार दि.१३ जुलै २०२५ रोजी राहते घरी निळगुण येथे होणार असल्याची माहिती त्यांचे सुपुत्र सुभाष गुगले यांनी दिली.

## निवडक

### चोरीप्रकरणी फरार आरोपी अटकेत

**रसायनी, मोहोपाडा :** कराडे बुद्रुकमधील बी जी एंटरप्राइज या कंपनीमध्ये फेब्रुवारी महिन्यात झालेल्या चोरीप्रकरणी दोन जणांना रसायनी पोलिसांनी अटक केली आहे. अनलेश चंद्रभूषण राय (वय २९, रा. श्रीरामपूर ता. जि. चंदवली राज्य उत्तर प्रदेश) रजनीश नरेश कुमार (वय २६, रा. अमरपूर, पो. बेहेपूर) अशी या गुन्हेगारांची नावे आहेत. आरोपींना गोपनीय बातमीदार व तांत्रिक विश्लेषण मदतीने दादर मुंबई येथून गुन्ह्याचे तपासकामी ताब्यात घेऊन अटक करण्यात आली आहे. मिळून आलेले आरोपींची चौकशी करून गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक प्रकाश माळी करीत आहोत. दरम्यान, याप्रकरणी याआधी दोन चोरांना अटक करण्यात आली होती.

### नांदगाव येथे घरफोडी

**पनवेल :** नांदगाव येथे घरफोडी करून चोराने रोख रक्कम, सोन्याचे दागिने आणि मोटरसायकल चोरून नेली. हरेंद्र भगत हे नांदगाव येथे राहत असून ते रात्री साडे अकराच्या दरम्यान खाली असलेल्या घराला लॉक लावून सर्वजण राहत्या ठिकाणी झोपले. सकाळी घराच्या दरवाजाला लावलेले लॉक तुटल्याचे दिसले. पाहणी केली असता रोख ५० हजार रुपये, सहा ग्राम वजनाची एक जोडी कुडी चोरीला गेल्याचे आढळले. तसेच घराबाहेर त्यांनी उभी केलेली दुचाकीही चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. त्यावर त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### सोन्याची चेन पळवून नेणारा गजाआड

**पनवेल :** आकुर्ली येथील सलूनमध्ये दाढी करताना फिर्यादीच्या गळ्यातील सोन्याची चेन घेऊन पसार झालेल्या असगर अली या चोरट्याला खांदेश्वर पोलिसांनी सिद्धार्थ नगर, उत्तर प्रदेश येथून अटक केली आहे. न्यायालयाने त्याला पोलीस कोठडी सुनावली आहे. सिद्धार्थ मोरे हे आकुर्ली येथे राहत असून ते गुरु रेसिडेन्सी येथे ते सलूनवाला असगर अली मुस्तकीन सलमानी याच्याकडे ते दाढी करण्यासाठी गेले होते. दाढी करत असताना त्यांची चैन घेऊन असगर अली पसार झाला होता. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केल्यानंतर पोलीस उपनिरीक्षक सोमनाथ मदने यांनी या गुन्ह्याचा तपास सुरू केला होता. दरम्यान असगर अली हा सिद्धार्थ नगर (उत्तर प्रदेश) येथून ताब्यात घेतले.

### कोंबड्यावाहक टेम्पोचा अपघात

**रसायनी :** मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील रसायनी



पोलीस ठाण्याच्या हद्दीत भातान बोगद्याच्या जवळ मुंबई लेनवर कोंबड्यावाहक टेम्पो समोर जाणाऱ्या गाडीला पाठी मागून ठोकल्याने अपघात झाला. चालक आणि त्याचा सहकारी गाडीमध्ये अडकला असता पोलिसांनी सुखरूप काढून कळंबोली येथील एमजीएम रुग्णालयात दाखल केले. ही घटना गुरुवारी सकाळी ६ वा सुमारास घडली. जखमींचे नाव मनोज कुमार शाहू (वय ४०), रणजीत कुमार गौतम (वय २५, रा. कानपूर उत्तर प्रदेश) अशी आहेत.

### कामोठ्यात जनजागृती अभियान

**पनवेल :** ज्येष्ठ नागरिकांची फसवणूक करणाऱ्या




आरोपीविरोधात कामोठे पोलिसांनी ठिकठिकाणी या आरोपींचे फोटो लावून जनजागृती अभियान राबविले आहे. लक्ष्मण रोहिदास पवार मु. इरळद, ता. गंगाखेड, परभणी सदरचे इसम हे हद्दीमध्ये मोफत धान्य वाटप तसेच वाढदिवसानिमित्त पैसे वाटप अशा प्रकारची बतावणी करून वृद्ध महिला तसेच इतरांची सोने तसेच पैसा मोबाईल त्यांची लूट करत आहेत. या व्यक्तीपासून आपण सावध रहा. या व्यक्ती आढळल्या तर तत्काळ ११२ किंवा कामोठे पोलीस स्टेशन ८६५५३५४११४ या नंबरवर संपर्क साधावा.

### कळंबोलीतून तरुण बेपत्ता

**पनवेल :** कळंबोली गाव परिसरात राहणार एक २२ वर्षीय



तरुण कोठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. मिराज अब्दुल समद आलम (वय २२, रा. कळंबोली गाव) उंची पाच फूट, रंग सावळा, अंगात पांढरा फुल शर्ट व पॅन्ट आहे. त्याला हिंदी व बंगाली भाषा अवगत आहे. या तरुणांबाबत माहिती असल्यास त्याने कळंबोली पोलीस ठाणे किंवा पोहवा बाबासाहेब शिरसाट (८३६९०४४६७९) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे वह्यावाटप

## विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घेत नाव उज्वल करावे -भाजप नेते अरुणशेठ भगत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाने दिलेल्या वह्यांच्या वापर करून विद्यार्थ्यांनी आपले हस्ताक्षण सुधारावे तसेच चांगले शिक्षण घेत आई वडीलांचे तसेच आपल्या गावाचे नाव उज्वल करावे, असा सल्ला भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांनी आसुडगावमध्ये आयोजीत केलेल्या वह्या वाटपाच्या कार्यक्रमावेळी केले.



श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यामतून दरावर्षी विविध शैक्षणिक उपक्रम राबवून गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात दिला जातो. त्यानुसार विकास मंडळाच्यावतीने आसुडगाव येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या वह्यांचे वाटप मंडळाचे उपाध्यक्ष तथा भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमाला भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, भाजप नेते शशीकांत शेळके, संज्योत शेळके, रमेश नाईक, मनोहर म्हात्रे, अशोक हुद्दार, बालम नाईक, साजन हुद्दार, अक्षय हुद्दार, किशोर शेळके, संदेश भोपी यांच्यासह पदाधिकारी, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांना आचार्य बाळशास्त्री जांभेकर जीवनगौरव पुरस्कार प्रदान

## मान्यवरांची उपस्थिती

**पनवेल : वार्ताहर**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने दरवर्षी पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पत्रकारांना विविध पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात येते. सन २०२४च्या पुरस्कारांचे वितरण मुंबई मराठी पत्रकार संघाच्या पत्रकार भवनात बुधवारी (दि. २) संध्याकाळी झाले. या सोहळ्यात ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांना आचार्य बाळशास्त्री जांभेकर जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.




या सोहळ्याला माजी केंद्रीय मंत्री तथा खासदार शरद पवार, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ विचारवंत अर्थतज्ञ डॉ. नरेंद्र जाधव, सुप्रसिद्ध मराठी सिने अभिनेते भरत जाधव, कामगार नेते महेंद्र घरत, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस प्रा. सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूर शेख, अनिल वाघमारे, शोभा जयपूरकर, विशाल परदेशी, दीपक कैतके, राजा आदाटे, संजय मिश्कीन, विनायक सानप, दीपक पवार, पांडुरंग म्हस्के आदी पदाधिकारी उपस्थित होते.

या सोहळ्यात अभिनेता भरत जाधव यांचा विशेष सन्मान करण्यात आला. त्याचप्रमाणे पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे महेश म्हात्रे, अभिजित करांडे, अमेय शिरोडकर, पांडुरंग पाटील, सर्वोत्तम गावरस्कर, दिनेश केळुस्कर, सीमा मराठे, बाळासाहेब पाटील, शर्मिला कलगुटकर, भरत निगडे आदींना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

# वादळग्रस्त भरपाईच्या प्रतीक्षेत

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

वादळी पावसाने उरण तालुक्यातील पूर्व विभागातील कळंबूसरे गावातील ७० हुन अधिक घरांच्या छपरांचे पत्रे व कौले उडून घरातील जीवनावश्यक वस्तूंचे अतोनात नुकसान झाले होते. आमदार महेश बालदी यांनी नुकसानग्रस्त गावातील नागरिकांना भेट देऊन त्यांनी तत्काळ नुकसानग्रस्त नागरिकांना प्राथमिक मदत केली होती.

वादळामध्ये कळंबुसरेमधील अनेकांचे संसार उघड्यावर आले. या गंभीर परिस्थितीमध्ये नुकसानग्रस्त जनता शासनाकडे मदत मागत असताना, या घटनेचे गांभीर्य ओळखून, आमदार महेश बालदी यांनी या घटनेत जातीने लक्ष घालून, नुकसानग्रस्त नागरिकांना भरीव मदत मिळावी, यासाठी तहसीलदारांना तत्काळ पंचनामे करून घेण्याचे आदेश दिले. त्यानुसार तहसीलदारांनी पूर्व विभागातील नुकसानग्रस्त नागरिकांच्या घरांचे पंचनामे करून घेतले, मात्र नुकसानग्रस्त नागरिकांना शासनाकडून अद्याप नुकसान भरपाई न मिळाली नाही. शासनाने या गंभीर बाबीची दखल घेऊन या नुकसानग्रस्त नागरिकांना लवकरात लवकर आर्थिक मदत द्याव, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

> कळंबूसरे येथे २६ मे रोजी चक्रीवादळात नुकसान झालेल्या घरांचे सरसकट पंचनामे करून त्याचा अहवाल रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविला आहे. त्याची मंजुरी मिळताच चक्रीवादळ नुकसानगस्तांना भरपाईची रक्कम शासनाकडून देण्यात येईल.
>
> **-के.डी.मोहिते, मंडळ अधिकारी, कोप्रोली, उरण मंडळ विभाग**

# इनरव्हील क्लब ऑफ पनवेलतर्फे वृक्षारोपण; २५ प्रजातींची लावली झाडे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इनरव्हील क्लब ऑफ पनवेलच्या २०२५-२६ या नवीन वर्षातील सामाजिक उपक्रमांची सुरुवात वृक्षारोपण उपक्रमाने करण्यात आली. पनवेल महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने आणि सौजन्याने आयटीआय कॉलेज ते तक्का उड्डाणपूल परिसरात क्लबच्या सदस्यांनी २५ विविध प्रजातींची झाडे लावली.



पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने तसेच विभागप्रमुख अनिल कोकटे यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिका विविध सामाजिक संस्था व नागरिकांसाठी मोफत रोपे वाटप कार्यक्रम राबवत आहे. या उपक्रमाला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. इनरव्हील क्लबच्या वृक्षारोपण प्रकल्पाच्या यशस्वी आयोजनासाठी महानगरपालिकेच्या उद्यान विभागाचे पर्यवेक्षक सिद्धार्थ कांबळे, उद्यान पर्यवेक्षक किरण गायकवाड, गजलक्ष्मी आंब्रे तसेच अन्य कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

या वेळी इनरव्हील क्लब ऑफ पनवेलच्या अध्यक्षा शुभांगी पिंपळकर, सचिव डॉ. अमृता नाईक, खजिनदार अवंतिका मारुलकर, प्रकल्प अध्यक्षा सुलभा निंबाळकर तसेच सदस्य सौ. सुनीता जोशी, डॉ. पत्की, संजीवनी मालवणकर आदी मान्यवर उपस्थित होते. इनरव्हील क्लब ऑफ पनवेलने पर्यावरण संरक्षण, हरित क्षेत्र संवर्धन आणि सामाजिक जबाबदारी या हेतूने पुढील वर्षभरात विविध उपक्रम राबवण्याचा संकल्प केला आहे.



**पनवेल : अनुभवी वकील संतोष खोपडे यांची गव्हर्नमेंट ऑफ इंडिया यांच्या वतीने नुकतीच नोटरी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानिमित्त त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेऊन आशीर्वाद घेते. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ॲड. संतोष खोपडे यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप कामगार मोर्चाचे प्रदेश सचिव संजय भगत, अनिल खोपडे आदी उपस्थित होते.**

# खारघरमध्ये अभिनय प्रशिक्षण शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अभिनयासाठी आवाज पूरक आणि आवाजासाठी रियाज महत्वाचा असल्याचे ज्येष्ठ नाटककार, कीर्तनकार, कलावंत अलिबागकर संतोष बोंद्रे यांनी सांगितले.



पनवेल महानगरपालिका व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली आठ दिवसांचे अभिनय प्रशिक्षण शिबिर खारघर येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात 'आवाज आणि आवाजाची कार्यशाळा' या विषयावर ते बोलत होते.

शिबिरार्थींना मार्गदर्शन करताना ते म्हणाले, आवाज ही आपणास मिळालेली ईश्वरी देणगी आहे. तिचे जास्तीत जास्त जतन करण्यासाठी रियाज महत्त्वाचा आहे. याकरिता दररोज थोडा थोडा शाब्दिक व्यायाम करावा. अगदी शेवटपर्यंत आपला आवाज खणखणीत राहावा यासाठी सर्वांनी प्रयत्न करावा. यावेळी त्यांनी आवाज यासाठी काही प्रात्यक्षिकही करून दाखवली.

या वेळी पनवेल महापालिकेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, नाट्य परिषद शाखा पनवेलचे कार्यवाहक शामनाथ पुंडे, स्मिता गांधी, प्रशिक्षक तथा ज्येष्ठ नाटककार अशोक केंद्रे, प्रा.रवी धुताडमल, प्रा. संकेत खेडकर उपस्थित होते.

# बीसीटी विधी महाविद्यालयाचे उल्लेखनीय यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील भागूबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयाचा उल्लेखनीय निकाल भागूबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयाने एलएल.बी. (३ वर्षे) आणि बी.ए. एलएल.बी. (५ वर्षे) अभ्यासक्रमांचे २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षासाठीचे निकाल नुकतेच जाहीर केले असून, यामध्ये विद्यार्थ्यांनी सर्व वर्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. यावर्षीच्या निकालांमध्ये एकूण शैक्षणिक प्रगतीमध्ये लक्षणीय सुधारणा दिसून आली आहे.

मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी व प्रावीण्य प्राप्त केले आहे. यशाची टक्केवारी सातत्याने वाढत असून, हे विद्यार्थ्यांच्या आणि प्राध्यापकांच्या कठोर परिश्रमांचे फलित आहे. मुंबई विद्यापीठाद्वारे जाहीर करण्यात आलेल्या अंतिम वर्षाचे निकाल अत्यंत अपवाद वगळता, या विधी महाविद्यालयाच्या सर्वच विद्यार्थ्यांनी यश संपादन केले असल्याने विशेष उल्लेखनीय ठरले. महाविद्यालय प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल अभिमान व्यक्त केला असून, त्यांनी उच्च शैक्षणिक दर्जा टिकवून ठेवल्याबद्दल त्यांचे कौतुक केले. हा निकाल विधी शिक्षणातील सातत्यपूर्ण प्रगतीचे व गौरवाचे प्रतीक ठरला.

प्राचार्या डॉ. सानवी देशमुख यांनी नमूद केले: २०२४-२०२५च्या परीक्षांमधील आमच्या विद्यार्थ्यांच्या कामगिरीबद्दल आम्हाला अभिमान वाटतो. हा निकाल त्यांच्या निष्ठेचे आणि महाविद्यालयात निर्माण झालेल्या शैक्षणिक वातावरणाचे प्रतीक आहे. महाविद्यालयाने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# नवीन पनवेलमध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिर

## केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील प्रशिक एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक प्रा ॲड. मोहन गायकवाड यांच्या वतीने दि. हौसाबाई आठवले स्मरणार्थ यूपीएससी एमपीएससी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र चालविण्याय येते. या उपक्रमांतर्गत नुकतेच स्वर्गीय पार्वतीबाई महादेव सावळेकर रोटरी सभागृह येथे छत्रपती शाहू महाराज जयंती व विद्यार्थी मार्गदर्शन प्रशिक्षण शिबीर मंगळवारी (दि.२) आयोजित करण्यात आले होते.




या कार्यक्रमाला केंद्रीय समाज कल्याण राज्यमंत्री रामदास आठवले यांचे प्रमुख उपस्थिती होती तर नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत पनवेल विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांनी विद्यार्थ्यांना ओघवत्या शैलीमध्ये मार्गदर्शन केले.

या वेळी क्रियाशील प्रेस क्लबचे अध्यक्ष तथा कोकण डायरी नियतकालिकाचे संस्थापक संपादक सय्यद अकबर, माजी नगरसेवक अरविंद सावळेकर, आरपीआय रायगड जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, किल्ले रायगडचे संपादक प्रमोद वालेकर, संपादक गणपत वारगड, प्रभाकर गायकवाड आदींची या वेळी प्रमुख उपस्थिती होती.

या वेळी उपस्थित विद्यार्थी मित्रांना संबोधित करताना रामदास आठवले म्हणाले की, भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर नेहमी म्हणायचे की जर तुमच्याकडे दोन रुपये असतील तर त्यातील एक रुपयाची भाकरी घ्या आणि एक रुपयाचे पुस्तक घ्या.भाकरी तुमची आजची भूक मिटवेल पण पुस्तकातून मिळणाऱ्या शिक्षणामुळे तुम्ही अनेकांची भूक मिटविण्याचे कसब जिंकाल.

या वेळी सय्यद अकबर म्हणाले की, आपल्या देशाची पुढची पिढी घडविण्याच्या दृष्टीने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र आणि मार्गदर्शन शिबिर अत्यंत महत्वाची कामगिरी बजावत असतात. मोहन गायकवाड यांच्या या अत्यंत स्तुत्य कार्यक्रमाचे मी मुक्तकंठाने कौतुक करतो तसेच अशा कार्यक्रमांच्या आयोजनामध्ये आम्हा पत्रकार बांधवांचे नेहमीच सक्रिय सहभाग असतील, अशी ग्वाही देतो. दरम्यान, या वेळी दहावी परीक्षेमध्ये चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनचा सत्कार करण्यात आला.

## संपादकीय

# भारताच्या भूमिकेकडे लक्ष

माझ्या उत्तराधिकाऱ्याची निवड 'गादेन फोड्रंग ट्रस्ट' ही संस्थाच करेल असे तिबेटी धर्मगुरू चौदावे दलाई लामा यांनी बुधवारी स्पष्ट केले. तर पंधराव्या दलाई लामांच्या नियुक्तीसाठी चीन सरकारची परवानगी आवश्यक असल्याची भूमिका चीनने घेतली. या वादात पडण्याची घाई भारताकडून केली जाईल असे सध्या तरी दिसत नाही.

**सध्याचे चौदावे दलाई लामा तेनजिन ग्यात्सो हे तिबेटी बौद्ध धर्माचे सर्वोच्च अध्यात्मिक गुरु असून बुधवारच्या त्यांच्या सुस्पष्ट निवेदनामुळे त्यांना उत्तराधिकारी असेल की भविष्यात ही परंपरा खंडित होईल याबाबतच्या चर्चेला पूर्णविराम मिळाला आहे. परंतु आता पंधरावे दलाई लामा कोण याभोवती वाद निर्माण होण्याची चिन्हे आहेत. चीन सरकारच्या मान्यतेनेच पुढील दलाई लामांची निवड होईल असे चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्याने म्हटले आहे. भारताकडून अद्याप यासंदर्भात कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया जाहीर करण्यात आलेली नाही. चीन आणि भारत यांच्या संबंधांत अलीकडच्या काळात बरीच सुधारणा झाली असून त्यामुळे भारत या वादग्रस्त मुद्यावर कोणतीही भूमिका घेण्याची घाई करणार नाही असे दिसते आहे. चीनच्या विरोधात भारताने भूमिका घेतल्यास त्याचा द्विपक्षीय संबंधांवर परिणाम नक्कीच होऊ शकेल. दरम्यान, चीनकडे आंतरराष्ट्रीय प्रतिस्पर्धी म्हणून पाहणाऱ्या अमेरिकेची यासंदर्भातील भूमिकाही महत्त्वाची ठरेल. सध्याचे दलाई लामा हे १९५९ पासून भारतात आश्रयाला आले असून पूर्वी ते तिबेटी संसदेचेही प्रमुख मानले जात. परंतु २०११मध्ये त्यांनी राजकीय नेतृत्वपदाचा त्याग केला असून निव्वळ आध्यात्मिक भूमिकाच त्यांनी कायम ठेवली आहे. सुमारे दीड लाखांहून अधिक तिबेटी नागरिकही सध्या भारतात वास्तव्य करून आहेत. ते येथे राहू, शिकू शकतात तसेच कामधंदाही करू शकतात. दलाई लामा यांच्या कार्यालयाने २०१५ मध्ये गादेन फोड्रंग ट्रस्टची स्थापना केली. दलाई लामा निवडीची परंपरा कायम राहील की नाही हे ९०व्या वर्षी जाहीर करणार असल्याचे दलाई लामा यांनी २०११ मध्ये म्हटले होते. सध्याचे चौदावे दलाई लामा हे येत्या ६ जुलै रोजी ९०व्या वर्षात पदार्पण करतील. या ९०व्या वाढदिवसानिमित्त धर्मशाला येथील त्सुगलागखांग येथे ३० जूनपासून सोहळा सुरू झाला आहे. आपला उत्तराधिकारी चीनबाहेरील व्यक्तीही असू शकेल. ती महिलाही असू शकेल अशी भूमिका दलाई लामा यांनी यापूर्वीच जाहीर केली होती. तर, सुयोग्य वेळ झाल्यावरच दलाई लामा यांचा पुनर्जन्म होईल. पुढील दलाई लामा तिबेट मधीलच असण्याची कोणतीही आवश्यकता नाही असेही ट्रस्टच्या अधिकृत सदस्याने आता पत्रकार परिषदेत सांगितले आहे. परंतु उत्तराधिकारी निवडीची ही योजना चीन सरकारने फेटाळली आहे. चीनला विश्वासात घेऊन परंपरेनुसारच ही निवड प्रक्रिया राबवावी लागेल असे चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्याने म्हटले आहे. दलाई लामांची परंपरा सातशे वर्षांपासून चालत आलेली असून कठोर प्रथापरंपरा व ऐतिहासिक रुढींनुसारच यापुढील दलाई लामांची निवड व्हायला हवी व या निवडीला चीन सरकारची मान्यताही असायलाच हवी यावर चीन ठाम आहे. दलाई लामांच्या निधनानंतर अन्य तिबेटी धर्मगुरू दलाई लामांचा पुढचा अवतार असलेल्या विशेष बालकाचा शोध घेतात अशी परंपरा आहे. उत्तराधिकारी निवडीविषयीच्या या वादातून पंधराव्या दलाई लामांच्या पदाकरिता दोन व्यक्तींची निवड होण्याची शक्यताही वर्तवली जाते आहे.**

# रायगड जिल्ह्यात 'मविआ'ची कसोटी

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका चार महिन्यात घेण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे आयोग कामाला लागला आहेच त्याच बरोबर राजकीय पक्ष देखील कामाला लागले आहेत. पावसाळा संपल्या नंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका होतील. रायगड जिल्ह्यात देखील राजकीय पक्ष कामाला लागले आहेत. रायगड जिल्ह्यात भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस अशी महायुती आहे. तर दुसरीकडे शेकाप, काँग्रेस, शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट अशी महाविकास आघाडी (मविआ) आहे. महाविकास आघाडीची सध्याची परिस्थिती पाहता आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मविआची कसोटी लागणार आहे.

लोकसभा निवडणूकीत देखील महायुती विरूध्द मविआ अशीच लढत झाली. विधानसभा निवडणूकीत देखील अशीच लढत झाली. या दोन्ही निवडणूकांमध्ये मविआचा पराभव झाला. विधानसभा निवडणूकीत मविआचा एकही उमेदवार निवडून आला नाही. सातही विधानसभा मतदारसंघांमध्ये महायुतीचे उमेदवार निवडून आले. भाजपाचे तीन, शिवसेनेचे तीन व राष्ट्रवादी काँग्रेसचा एक असे सात आमदार महायुतीचे निवडून आले. आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांमध्ये महाविकास आघाडी एकत्र निवडणूक लढवेल असे सांगितले जात आहे. परंतु मागील काही दिवसांमध्ये झालेल्या घडामोडींकडे पाहता ही महाविकास आघाडी टिकेल किंवा नाही हे सांगता येत नाही. रायगड जिल्ह्यात कोणताही एक पक्ष रायगड जिल्हा परिषदेवर एक हाती सत्ता मिळवू शकणार नाही. सर्वच पक्षांची स्वबळावर निवडणूक लढवली तर सत्ता मिळविण्यासाठी कुणाशी तरी आघाडी करावीच लागेल. सध्या रायगड जिल्ह्यात भाजपाचे तीन, शिवसेनेचे तीन तर राष्ट्रवादी काँग्रेसचा एक असे सात आमदार महायुतीचे आहेत. जर महायुतीने एकत्रीत निवडणूक लढवली तर महाविकास आघाडीचा सुफडा साफ होईल अशी परिस्थिती आहे.

मागील अडीच वर्षात रायगडची राजकीय परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. रायगड जिल्हा परिषदेत सर्वाधिक अध्यक्ष ज्या पक्षांचे निवडून आले ते काँग्रेस आणि शेकाप कमकुवत झाले आहेत. शिवसेना ठाकरे गटाची देखील ताकद राहीलेली नाही. अशा परिस्थितीत हे तीन पक्ष एकत्र येऊन लढले तरी त्याचा काही परिणाम होणार नाही. काँग्रेस पक्षाकडे नेतृत्व नाही. माजी आमदार पंडित पाटील, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील यांनी व त्यांच्या समर्थकांनी शेकाप सोडल्यामुळे शेकापची ताकद कमी झाली आहे. या दोघांनी व त्यांच्या समर्थकांनी भाजपात प्रवेश केल्यामुळे शेकापचाच बालेकिल्ला असलेल्या अलिबाग तालुक्यातच शेकाप कमकुवत झाला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकामंध्ये महाविकास आघाडीतील घटक पक्षांना उमेदवार शोधावे लागणार आहेत.

रायगड काँग्रेसने युंवक कार्यकर्त्यांसाठी दोन दिवसांचे शिबीर अलिबाग येथे आयोजित केले होते. या शिबिराला लाभलेली युवकांची उपस्थिती पाहता रायगडमधील कॉंग्रेसचे भवितव्य अधांतरी असल्याचे दिसते.आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने पक्ष संघटनेला उभारी देण्याचे प्रयत्न सुरु केले आहेत.

येथे युवा कार्यकर्ता शिबीराच्या समारोप सत्राला प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी हजेरी लावली. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांना आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकीबाबत काँग्रेसची भूमिका काय असा प्रश्न विचारला असता, त्यांनी लोकसभा, विधानसभा निवडणूक आम्ही महाविकास आघाडीच्या माध्यमातून लढलो असलो तरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत महाविकास आघाडी होईलच असे नाही असे स्पष्टीकरण दिले. गेल्या २५ वर्षात आघाडीच्या तडजोडीमुळे पक्षाचे मोठे नुकसान झाले आहे. क्षमता असूनही पक्षाला आणि कार्यकर्त्यांना अपेक्षित संधी मिळू शकली नाही. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीत आघाडीबाबत स्थानिक पातळीवर जिल्हा आणि तालुका कमिट्यांना आघाडीबाबतचे निर्णय घेण्याचे अधिकार दिले जातील असेही त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे काँग्रेस स्वबळावर निवडणूक लढविण्याच्या तयारीत असल्याचे दिसते.गेल्या दशकात पक्षाची झालेली वाताहत लक्षात घेता आगामी काळात रायगड जिल्ह्यात पक्षाला गत वैभव प्राप्त करणे कठीण आहे. शेकापची देखील तीच परिस्थिती आहे. पक्ष फुटला आहे. पक्षाची ताकद कमी झाली आहे. अलिबाग तालुक्यातच पक्षाला घरघर लागली आहे. पेझारीत मेळावा घेऊन शेकापचे सरचिटणीस माजी आमदार जयंत पाटील यांनी ताकद आजमावण्याचा प्रयत्न केला. शिवसेना ठाकरे गट गप्पच आहे. मविआच्या घटक पक्षांची ताकद फार राहीलेली नाही. रायगड जिल्हा परिषदेच्या निवडणूकीत हे तीन पक्ष एकत्र येऊन निवडणूक लढले तरी फार मोठे यश मिळणार नाही. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत महाविकास आघाडीची कसोटी लागणार आहे. त्यांना आपले अस्तित्व टिकविण्यासाठी मेहनत घ्यावी लागणार आहे.

# कादंबरीकार रघुनाथ दिघे

मराठी कादंबरीकार. जन्म कल्याण येथे. त्यांच्या वडिलांची नोकरी बदलीची असल्यामुळे दिघे ह्यांचे शालेय शिक्षण कर्जत, खोपोली, जळगाव, चाळीसगाव, सोलापूर, रत्नागिरी अशा विविध ठिकाणी झाले पुणे येथे राहून त्यांनी बी. ए., एलएल. बी. पर्यंतचे महाविद्यालयीन शिक्षण घेतले त्यानंतर पनवेल येथे अल्पकाळ वकिली केल्यानंतर १९२७ मध्ये ते पुण्यास आले आणि १९४२ पर्यंत मुख्यतः फौजदारी कोर्टात त्यांनी वकिली केली. त्यानंतर मात्र वकिलीचा व्यवसाय सोडून देऊन ते शेती करू लागले. खोपोलीजवळच्या विहारी ह्या गावात तेव्हापासून त्यांचे वास्तव्य आहे.



दिघे हे प्रादेशिक कादंबरीकार. ग्रामीण जीवनाच्या प्रत्यक्ष अनुभवातून व निसर्गाच्या रम्य सहवासातून त्यांचे लेखन स्फुरलेले आहे. त्यांनी शिकारीचाही छंद होता. त्यांच्या कादंबऱ्यांत नाट्यपूर्ण, रसरशीत साहसी घटना, अद्भुतरम्य वातावरण, काव्यात्म वर्णने, ठसठशीत व्यक्तिदर्शने, ग्रामीण जीवनाचे प्रत्ययपूर्ण चित्रण ह्यांचे प्राचुर्य असते. दिघे यांनी काही कथालेखनही केलेले आहे. माझा सबूद नावाचे नाटकही त्यांनी लिहिले आहे (१९४९). गातात व नाचतात धरतीची लेकरे (१९५०) नावाचा त्यांचा एक लोकगीतसंग्रहही आहे. पण त्यांची मुख्य मदार आहे ती कादंबरीलेखनावर. गानलुब्धा मृगनयना (१९४७) ऐतिहासिक रम्याद्भुत कादंबरी सोडल्यास त्यांचे कादंबरीलेखन मुख्यतः ग्रामीण जीवनावर आधारलेले आहे.

त्यांची पहिली कादंबरी पाणकळा (१९३९). नगरकडील ग्रामीण जीवनात तीत कहाणी आहे. या कादंबरीच्या आगमनापर्यंत ग्रामीण जीवन कादंबरीविश्वात उपेक्षितच होते विषयाच्या नवाईमुळे आणि शैलीतील काव्यात्मतेमुळे ही कादंबरी बरीच गाजली तिला १९४० साली ना. सी. फडके पारितोषिकही मिळाले. पाणकळाच्या लोकप्रियतेमुळे दिघे यांचा लेखनोत्साह वाढीस लागला. दिघे यांनी आपल्या ग्रामीण कादंबऱ्यांत जो परिसर निवडलेला आहे, तो अंतर्बाह्य ग्रामीण व कृषिव्यवसायात्मक असतो. दिघे स्वतःला अभिमानाने शेतकरी कादंबरीकार म्हणवून घेतात. पुष्कळदा त्यांच्या कादंबऱ्यांत शेतीविषयक प्रश्नांचा व इतर सुधारणांचाही अंतर्भाव होतो. उदा., कोरडवाहू शेती व बांधबंधारे यांचा संबंध त्यांनी पड रे पाण्यात दाखविला आहे कार्तिकीत अस्पृश्यतेच्या विषयाला हात घातलेला आहे, तर आई आहे शेतात मध्ये जमीनदार आणि कूळ यांच्यातील संबंधांना स्पर्श केलेला आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# टाटा हॅरियर ईव्ही भारतात लाँच

इलेक्ट्रिक गाड्यांच्या स्पर्धेत आता टाटा मोटर्सने एक मोठा धमाका केला आहे. नुकतीच त्यांनी Tata Harrier.ev भारतात लाँच केली असून या कारची बुकिंगही सुरू करण्यात आली आहे. या कारचे फीचर्स जाणून घेऊया...



ही टाटाची पहिली सर्व्ह-व्हील ड्राइव्ह असलेली इलेक्ट्रिक कार ठरणार आहे. ब्रँडच्या इतिहासात ही एक महत्त्वाची पायरी मानली जात आहे. ह्या इलेक्ट्रिक एसयुव्ही चे एकूण पाच व्हेरिएंट्स बाजारात उपलब्ध आहेत, विशेष बाब म्हणजे, टाटा इव्ही वापरकर्त्यांसाठी एक लाखांचा लॉयल्टी बोनसही देण्यात येणार आहे, ज्यामुळे जुन्या ग्राहकांनाही या नव्या मॉडेलकडे वळायला प्रोत्साहन मिळणार आहे. या एसयुव्हीचं सर्वात खास वैशिष्ट्य म्हणजे ती एका सिंगल चार्जमध्ये ६२२ किमी रेंज देते, जी तिच्या सेगमेंटमध्ये उल्लेखनीय मानली जाते. Harrier.evमध्ये दोन बॅटरी पॅक पर्याय आहेत, ज्यात ६५ केड्ब्लुएच आणि ७५ केड्ब्लुएच चा समावेश आहे. ६५ केड्ब्लुएच बॅटरी असलेल्या व्हेरिएंट्समध्ये ५३८ किमीचा ARAI सर्टिफाईड रेंज मिळतो. ७५ kWह बॅटरी असलेल्या आरड्ब्लुडी आणि AWD मॉडेल्समध्ये अनुक्रमे ६२७ किमी आणि ६२२ किमी रेंज असल्याचा दावा करण्यात आला आहे.

पॉवरबाबत बोलायचं झालं तर: आरड्ब्लुडी मॉडेल २३८ hp पॉवर आणि ३१५ Nm टॉर्क देतो. या गाडीचं इंटीरियरही जबरदस्त अपग्रेड केलं आहे.

यामध्ये आहे - १०.२५ इंच डिजिटल इन्स्ट्रुमेंट क्लस्टर, सॅमसंग टेक्नॉलॉजीने सजलेली १४.५३ इंचाची Harman इंफोटेनमेंट स्क्रीन (जगातील पहिली), साउंड सिस्टीम (Dolby), व्हॉइस कंट्रोल पॅनोरामिक सनरूफ, व्हेंटिलेटेड आणि मेमरी फंक्शन असलेली सीट्स, ॲम्बियंट लाइटिंग आणि बरेच काही.यामध्ये दिलेला नवा ५४० डिग्री कॅमेरा फंक्शन एक भन्नाट वैशिष्ट्य ठरत आहे. हे ३६० डिग्री सराउंड व्यू सिस्टीममध्ये एक विशेष अँगल जोडतं, जे कारच्या खालच्या भागाचं दृश्यही ड्रायव्हरला दाखवतं. ट्रान्सपेरंट मोड नावाने ओळखला जाणारा हा मोड ऑफ-रोड ड्रायव्हिंगसाठी विशेषतः गटारं, मोठे खड्डे आणि कठीण भूभाग ओलांडताना. अत्यंत उपयुक्त आहे,

# गायक-अभिनेते पं. निवृत्तीबुवा सरनाईक

**निमित्त**



हिंदुस्थानी रागसंगीताच्या क्षेत्रातील जयपूर-अत्रौली गायकीशी संबंधित एक अग्रगण्य गायक म्हणजे पं. निवृत्तीबुवा सरनाईक. त्यांचा जन्म ४ जुलै १९१२ रोजी कोल्हापूर येथे संगीतप्रिय कुटुंबात झाला. त्यांचे वडील तुकारामबुवा सरनाईक (मूळ उपनाम जाधव) हे एक नावाजलेले भजनी गायक होते.

निवृत्तीबुवांना दोन मोठे भाऊ व एक बहीण. निवृत्तीबुवा चार वर्षांचे असतानाच त्यांच्या मातोश्री निवर्तल्या. काही कालावधीनंतर त्यांच्या वडिलांनी दुसरा विवाह केला. कौटुंबिक कारणामुळे वडिलांनी आपल्या तीन अपत्यांस प्रथमपत्नीच्या माहेरी पाठवले. निवृत्तीबुवांना मात्र त्यांची बालवयातच दिसून आलेली गायनाची आवड लक्षात घेऊन त्यांनी त्यांचे सर्वांत कनिष्ठ बंधू शंकरराव सरनाईक यांच्या हवाली केले. 'महाराष्ट्र कोकीळ' शंकरराव सरनाईक हे प्रसिद्ध गायक-नट होते. मराठी नाटक व चित्रपटसृष्टीमध्ये आपल्या उत्तम अभिनयाने प्रख्यात झालेले गायक-अभिनेते अरुण सरनाईक यांचे ते वडील होत. तेव्हा शंकरराव हे गोविंदराव टेंबे यांच्या 'शिवराज संगीत नाटक मंडळी'मध्ये काम करीत असत. त्यांच्यासह निवृत्तीबुवांचे गायन-शिक्षण आणि नाटक मंडळीबरोबरची भ्रमंती चालू झाली. शंकरराव १९१९च्या सुमारास कोल्हापुरास परतले. इंदूर संस्थानचे राजे तुकोजीराव होळकर यांच्या पाठिंब्याने शंकररावांनी सुरू केलेल्या यशवंत संगीत नाटक मंडळीत कृष्णराव गोरे, सवाई गंधर्व, नत्थूखाँ असे अनेक मोठे गवई होते. आपल्या काकांसह या सर्वांच्याच गायनाचे संस्कार निवृत्तीबुवांवर झाले, पण त्यांच्या औपचारिक गायनशिक्षणाची सुरुवात मात्र गोविंदबुवा भावे यांच्यापासून झाली. तबलावादक बळवंत रुकडीकर व बाबालाल इस्लामपूरकर यांच्याकडून तबलावादनचे शिक्षणही त्यांनी घेतले. त्यामुळे त्यांच्या गायनातही लयतालाचे सूक्ष्म अंग दिसू लागले.

निवृत्तीबुवांनी आठ वर्षांचे असताना चलती दुनिया या हिंदी संगीत-नाटकात तोता-मैना या पात्रांपैकी 'तोता' हे पात्र साकारले. पुढे १४ वर्षांचे झाल्यावर नायिकेच्या भूमिकाही त्यांनी केल्या. काही काळ संगीत नाटकांत स्त्री-भूमिका करून त्यांनी नाव मिळवले. त्यांची सत्याग्रही या नाटकातील नारदाची भूमिका खूप गाजली. या काळात त्यांना सवाई गंधर्व यांच्याकडून किराणा घराण्याच्या स्वरमाधुर्यप्रधान गायकीची तालीम मिळाली. काका शंकरराव यांना ख्यालगायकी शिकण्याचा खूपच नाद होता, मात्र नाटक मंडळीच्या व्यापातून तालीम घ्यायला त्यांना वेळ होत नसे. अशा वेळी उस्तादांनी आपला पुतण्या निवृत्तीस शिकवावे, असे ते सांगत. त्यामुळे निवृत्तीबुवांना उस्ताद रजब अलीखाँ आणि उस्ताद अल्लादियाखाँ या दोघांचीही तालीम मिळाली. त्यांच्या गायनात किराणा व जयपूर-अत्रौली या दोन्ही गायकींचा सुरेख मिलाप झालेला दिसतो.

१९६६ साली निवृत्तीबुवा कोल्हापूरहून मुंबईस स्थायिक झाले. १९६९ ते १९७९ या कालावधीत मुंबई विद्यापीठाच्या संगीत विभागात गायनगुरू म्हणून त्यांनी काम केले. १९७९पासून पुढे काही काळ कोलकाता येथील आयटीसी संगीत रिसर्च अकादमीमध्ये ते गायनगुरू होते. कंपवाताच्या विकाराने ग्रासल्याने ते मुंबईस परतले. १६ फेब्रुवारी १९९४ रोजी त्यांचे निधन झाले.

**-मनीषा पोळ (मराठी विश्वकोष)**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# केळ्याच्या सेवनाने मिळणारे आरोग्यदायी फायदे

एका संशोधनानुसार, केळ्यामध्ये आहारातील फायबर, विशेषतः पेक्टिन भरपूर प्रमाणात असते, जे आतड्यांची हालचाल सुरळीत करण्यास मदत करते. जर तुम्हाला जेवणानंतर अनेकदा पोटफुगी किंवा आळस येत असेल, तर केळ्यामुळे तुमच्या शरीराची पचनक्रिया त्रासाशिवाय हळुवारपणे सुधारण्यास मदत करू शकते. त्याशिवाय केळ्यामध्ये प्री-बायोटिक्स असतात जे अस्वस्थ वाटत असताना आतड्यांचे आरोग्य पुनर्संचयित करण्यास मदत करू शकतात. केळे मऊ, सहज पचण्याजोगे आणि तुमचे पचन सुरळीतपणे चालू ठेवण्यासाठी परिपूर्ण असे आहे.



केळी हे ग्लुकोज, फ्रुक्टोज व सुक्रोज यांसारख्या नैसर्गिक साखरेचे जलद स्त्रोत आहेत, ज्याने तुम्हाला स्थिर ऊर्जा मिळते. म्हणूनच २०१२ च्या एका संशोधन पत्रानुसार, खेळाडू आणि खेळाडूंमध्ये केळ्याच्या सेवनाला प्राध्यान्य दिले जाते. केळ्यामध्ये व्हिटॅमिन बी६ देखील भरपूर असते, जे अन्नाचे ऊर्जेमध्ये रूपांतर करण्यास मदत करते. म्हणून पुढच्या वेळी जेव्हा तुम्हाला थकल्यासारखे वाटेल तेव्हा केळी खाण्याचा प्रयत्न करा.

**हृदयाच्या कार्यास समर्थन**

युनायटेड स्टेट्स डिपार्टमेंट ऑफ ॲग्रीकल्चरच्या अधिकृत वेबसाइटनुसार, एका मध्यम केळ्यामध्ये ४२२ मिलिग्रॅम पोटॅशियम असते, जे रक्तदाब नियंत्रित करण्यास आणि हृदयाच्या कार्यास समर्थन देणारे असे खनिज आहे. पोटॅशियमयुक्त पदार्थ नियमितपणे खाल्ल्याने कालांतराने हृदयाशी संबंधित समस्यांचा धोका कमी होऊ शकतो. त्याशिवाय या फळात चरबी आणि सोडियमचे प्रमाण कमी असते, ज्यामुळे ते हृदयासाठी अनुकूल नाश्ता ठरते.

मानसिक थकवा दूर करण्याची क्षमता

केळ्यामध्ये असलेल्या व्हिटॅमिन बी६ सामग्रीमुळे केळी तुमच्या शरीरात सेरोटोनिन उत्पादनास मदत करू शकतात, ज्यामुळे तुमचा मूड चांगला राहू शकतो. म्हणून तुमच्या कंटाळवाण्या दिवसांमध्ये एक केळी खाल्ल्याने तुमचा मूड खरोखरच फ्रेश होऊ शकतो. हा एक नैसर्गिक नाश्ता आहे, जो जंक फूडप्रमाणे तुमच्या रक्तातील साखरेचे प्रमाण वाढवत नाही आणि जेव्हा तुम्हाला मानसिक थकवा जाणवत असेल, तेव्हा होणारी चिडचिड किंवा थकवा कमी करू शकतो.

# श्रीवर्धन समुद्र किनाऱ्याला मोठ्या उधाणाचा फटका

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**



कोकणातील प्रसिद्ध पर्यटन स्थळ असलेल्या श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्याला गेल्या काही दिवसांपासून जोरदार लाटा आणि उधाणाचा मोठा फटका बसत आहे. किनाऱ्याच्या संरक्षणासाठी बांधलेल्या बंधाऱ्यावर केलेले सौंदर्यीकरण आणि सुविधा या समुद्राच्या प्रचंड लाटांमुळे अक्षरशः उध्वस्त झाल्या आहेत.

विशेषतः बंधाऱ्यावर पर्यटकांसाठी बांधलेला रॅम्प आणि पायऱ्यांवरील ग्रॅनाइटच्या लाद्या लाटांच्या तडाख्यातून पूर्णपणे उखडून गेल्या आहेत. या ठिकाणी खोल मोठे तडे पडले असून, रॅम्पचा काही भाग कोसळून बंधाऱ्यातून उखडला आहे. परिणामी स्थानिक नागरिक तसेच पर्यटकांना समुद्रकिनाऱ्यावर जाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

स्थानीक नागरिकांच्या मते, सध्या लाटा इतक्या जोरात येत आहेत की बंधाऱ्याचे मोठमोठे दगडही किनाऱ्यावर ओढले जात आहेत. मठाचा गवंड, केतकी बन, गणपती विसर्जन रस्ता या ठिकाणचे रॅम्प आणि पायऱ्या पूर्णपणे मोडल्या गेल्या आहेत. तुटलेल्या लाद्या आणि दगड विखुरले असल्यामुळे पाय मुरगळणे, घसरून पडणे अशा अपघातांची शक्यता वाढली आहे.

सन २००९ साली श्रीवर्धन नगरपरिषदेने सुमारे दीड किलोमीटर लांबीचा बंधारा बांधला होता. दांडा विभाग ते महेश्वर पाखाडी येथील नाल्यापर्यंत हा बंधारा उभारण्यात आला होता. यामागचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे समुद्राच्या उधाणामुळे होणारे नुकसान टाळणे. पाण्यामुळे वस्ती, शेती, वाड्यांमध्ये होणारे आर्थिक नुकसान रोखणे हे या बांधकामाचे मूळ कारण होते.

पुढे पर्यटनाच्या दृष्टीने या बंधाऱ्यावर सुशोभीकरण करण्यात आले. पर्यटकांसाठी सुंदर ग्रॅनाइट लाद्या, बाके, आकर्षक दिवे, शोभिवंत झाडे, सुमारे दीड किलोमीटर अंतरावर भव्य पायऱ्या आणि गणपती विसर्जनासाठी रॅम्प बांधण्यात आले. या सुविधा पर्यटनवाढीला चालना देत होत्या. परंतु अलीकडील उधाणामुळे या सर्व सुविधा मोडकळीस आल्या आहेत.

सध्या परिस्थिती इतकी बिकट झाली आहे की स्थानिक आणि पर्यटकांना या मोडकळीस आलेल्या रस्त्यांवरून धाडस करूनच किनाऱ्याकडे जावे लागते. पर्यटकांमध्ये अस्वस्थता वाढली आहे. या बंधाऱ्याची दुरुस्ती तातडीने न केल्यास येत्या पावसाळ्यात परिस्थिती आणखी बिकट होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

स्थानिक नागरीकांनी श्रीवर्धन नगरपरिषदेची तातडीने दखल घेऊन या रॅम्प, पायऱ्या आणि लाद्यांची जलद गतीने दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. तसेच पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी मजबूत पावले उचलावीत, अन्यथा येथील पर्यटन व्यवसायालाही फटका बसेल, अशा प्रतिक्रिया येत आहेत.

# पुलाच्या कठड्याची दुरूस्ती कधी होणार? कलोते हद्दीत अपघातप्रणव क्षेत्राकडे दुर्लक्ष

**चौक :** पुलाचा कठडा तोडून एक माल वाहतूक करणारे वाहन पुलाच्या खाली पडले होते, पण तुटलेला कठडा दुरुस्त करण्यास आयआरबी यांना वेळ नाही, असेच चित्र दिसत आहे.

जुना मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार, ग्रुप ग्रामपंचायत कलोते हद्दीत, कलोते धरणाच्या ओव्हर फ्लो च्या पाटावर मुंबई पुणे रस्त्यावर एक पूल आहे, या पुलावरून काही दिवसांपूर्वी एक मोठी गाडी पडून पुलाचे नुकसान झाले असून, पुलाचा कठडा तुटला आहे. त्यामुळे त्या ठिकाणी बॅरिकेट लावण्यात आले आहे, आता पावसाचे दिवस सुरू असून सद्या मोठा पाऊस पडत आहे, त्यामुळे रात्रीच्या अंधारात हे बॅरिकेट दिसत नाहीत, त्यामुळे धोका निर्माण झाला आहे, कार्याशी तत्पर असलेली आणि या रस्त्याची देखभाल दुरुस्ती करणारी यंत्रणा सतत काहीना काही काम करत त्यांच्या गाड्या फिरत असताना दिसतात. या पुलाच्या अगदी कडेला दोन बार आहेत, त्यामुळे येथे वर्दळ असतेच, अगदी थोड्या अंतरावर कलोते धरणाकडे जाणारा रस्ता आहे, पलिकडील बाजूला रिसॉर्ट आहे. सतत गाड्यांची क्रॉसिंग होत असते. त्यामुळे या कठड्याची दुरुस्ती त्वरीत करण्यात यावी, अशी मागणी येथील स्थानिक करत आहेत.


## उरण नगरपरिषद
### निविदा सूचना

उरण नगर परिषदखाली नमुद केलेल्या कामाकरिता नोंदणीकृत अथवा अनुभवी कंत्राटदाराकडून मोहरबंद निविदा /दरपत्रके मागवित आहे. निविदा /दरपत्रक दिनांक १४/०७/२५ रोजी सायंकाळी ४:०० वाजेपर्यंतच्या मुदतीत मुख्याधिकारी उरण नगरपरिषद उरण यांचे नावे दाखल करणेच्या आहेत.

| अ.क्र. | तपशील | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|
| १. | उरण नगरपरिषद आस्थापनेवर कार्यरत वर्ग ३ व ४ चे कर्मचारी यांना आर्थिक वर्ष २०२५-२६ करिता गणवेश कापड, साडी, ब्लाउज कापड व पेटीकोट खरेदी करणे तसेच शिलाई करणे बाबत | ३०००/- | १०००/- |

सदर कामाच्या अटी व शर्ती भांडार विभागात माहिती करिता उपलब्ध असून इच्छुक टकदारांनी भांडार विभाग प्रमुख यांचेशी संपर्क साधावा.

**जा.क्र. उनप/भंडार/९५/२०२५-२६**
**उरण नगरपरिषद, उरण, जि. रायगड.**
**दिनांक : ०३/०७/२०२५**

**सही/-**
**(समीर जाधव)**
**मुख्याधिकारी,**
**उरण नगरपरिषद, उरण**

।।अविश्रमो लोकतंत्राधिकारा।।
## खोपोली नगरपरिषद, खोपोली
**ता. खालापूर, जि. रायगड, पिनकोड नं. ४१० २०३.**
फोन नं. (०२१९२)२६४२१२ Email ID :- cokmckhpoli@gmail.com

### दरपत्रक सुचना

खोपोली नगरपरिषद कार्यालयीन कामकाजासाठी राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या कृति आराखड्यातील ई-गव्हर्नन्स सुधारणे अंतर्गत सर्विस डीलिवरी साठी GIS/Remote sensing/Locational service चा वापर करून खोपोली नगरपरिषद करीता अप्लिकेशन बनविणे, या कामी अंदाजपत्रक बनविणेसाठी शासनाच्या राज्य दर सुचित दर उपलब्ध नसल्याने भाजारभावानुसार दरपत्रक मागविणे करीता अधिकृत पुरवठाधारककाकडून जाहीर पद्धतीने दरपत्रक मागविणेत येत आहेत.

**तपशिल खालील प्रमाणे:-**

| अ.क्र. | कामाचा तपशील |
|---|---|
| १ | राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या कृति आराखड्यातील ई-गव्हर्नन्स सुधारणे अंतर्गत सर्विस डीलिवरी साठी GIS/Remote sensing/ Locational service चा वापर करून खोपोली नगरपरिषद करीता अप्लिकेशन/वेब पोर्टल बनविणेबाबत. |

**नियम व अटी :-**
१. वरील नमुद कामकाजाबाबतची माहिती तपशीलवार नगरपरिषद कार्यालयातील संगणक विभागामध्ये कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल. तसेच प्रत्येक्ष पाहणी करूनच पुरवठाधारकाने दर नमूद करावयाचे आहेत.
२. पुरवठादाराने स्वतःचे लेटरहेडवर सुस्पष्ट अक्षरात खाडाखोड न करता दर नमूद करून, स्वाक्षांकित करून एक बंद लखोठ्यात सिलबंद करून दरपत्रके सादर करावीत. अशा लखोट्यावर करावयाचे कामाचे नाव ठळक अक्षरात नमूद करून मुख्याधिकारी, खोपोली नगरपरिषद, खोपोली यांचे नावे विहित मुदतीत म्हणजे दि.०४/०७/२०२५ ते दि.१०/०७/२०२५ रोजी सायं. ०५:०० पर्यंत खोपोली नगरपरिषद कार्यालय येथे स्विकारण्यात येतील.
३. विहित मुदतीत प्राप्त होणारी दरपत्रकेच स्विकारली जातील. विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे दरपत्रक ग्राह्य धरली जाणार नाहीत. त्यामुळे कोणतीही सबब विचारात घेतली जाणार नाही.
४. वरील प्रमाणे विविध मुदतीत प्राप्त होणाऱ्या सर्वात कमी दराच्या दरपत्रकानुसार होणाऱ्या अंदाजपत्रकास शासनाकडील सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता मिळाल्यानंतर, विहित्त पद्धतीने निविदा प्रक्रियेची कार्यवाही करणेत येईल.
५. वरील नमुद कामकाजाकरीताचे दर सर्व करासहीत देण्यात यावे.
६. कोणतेही कारण नमूद करून अथवा असे कारण न देता आलेले दरपत्रके स्वीकारणे अथवा फेटाळण्याचा अधिकार नगर परिषदेने राखुन ठेवला आहे.
७. कामाचे अटी-शर्तीमध्ये आवश्यकतेनुसार बदल करणेचा अधिकार नगरपरिषदेने राखुन ठेवला आहे.

**जा.क्र. केएमसी/संगणक/१५४३**
**दि.०३/०७/२०२५**

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**खोपोली नगरपरिषद**

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक २२/२०२५-२०२६ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | रोहा येथील अग्निशमन केंद्र या अनिवासी इमातीची देखभाल व दुरूस्ती..... रोहा येथील अग्निशमन केंद्रातील व मऔविमच्या कर्मचारी वसाहतीमधील जुन्या ड्रेनेज लाईन व चेंबर्स बदलणे व वॉटरप्रूफिंगचे काम करणे. (दुसरी मागणी) | ₹ ३८,९६,३०८.०० |
| २. | विळे भागाड औद्योगिक क्षेत्रातील उप विभाग कार्यालयाची दुरुस्ती करणे. (दुसरी मागणी) | ₹ ३६,४८,६५०.०० |

उपरोक्त कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक ०७/०७/२०२५ ते दिनांक १६/०७/२०२५ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामाबाबत दिनांक ०९/०७/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १०/०७/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा राम प्रहर

जाहिर निविदा

## ग्रामपंचायत माडप
**ता. खालापुर, जि. रायगड**

दिनांक ०४/०७/२०२५

सर्व बांधकाम ठेकेदार व पुरवठादार यांस जाहिर निविदाद्वारे कळविण्यात येते की, ग्राम पंचायत माडप ता. खालापुर, जि. रायगड यांजकडुन ग्रामपंचायत १५ वा वित्त आयोग व ग्रामनिधी कामाच्या अनुभविक इच्छुक जी.एस.टी. धारक ठेकेदारांकडुन व पुरवठा धारकांकडुन लिफाफा पद्धतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तरी ज्या ठेकेदारांना सदरची कामे करावयाची आहेत व पुरवठाधारकांनी ज्या वस्तु पुरवायचे आहेत त्यांनी आपली निविदा दि.०४/०७/२०२५ पासुन दि.११/०७/२०२५ पर्यंत सकाळी ठिक १०.०० वाजेपर्यंत समक्ष ग्रामपंचायत कार्यालयात सादर करावीत व सदर निविदा दि.११/०७/२०२५ रोजी सकाळी ठिक ११.०० वा. मा. सरपंच व सदस्य व ठेकेदार/पुरवठादार यांच्या उपस्थितीत समक्ष उघडण्यात येतील. कोणतीही एक अगर सर्व निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा आधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवलेला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | योजनेचे नाव | इसारा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | वैभव मालकर यांच्या घरापासुन ते जर्नादन लक्ष्मण घोडविंदे यांच्या घरापर्यंत रस्त्याचे खड्डे भरणे, | ३,००,०००/- | ग्रामनिधी २०२५-२०२६ | ३,०००/- | ६ महिने |
| २. | माडप गाव अंतर्गत गटारे दुरुस्ती करणे, | २,९९,०००/- | ग्रामनिधी २०२५-२०२६ | २,९९०/- | ६ महिने |
| ३. | ड्रेनेज वाहिनी दुरुस्ती करणे. (रमेश पाटील ते वैभव मालकर यांच्या घरापर्यंत गटार दुरुस्ती करणे.) | १,४४,१२०/- | १५ वा वित्त आयोग अबंधित २०२५-२०२६ | १,४४१- | ६ महिने |
| ४. | मुठा ठाकुरवाडी रस्त्याचे खड़े भरणे. | २,००,०००/- | ग्रामनिधी २०२५-२०२६ | २,०००/- | ६ महिने |
| ५. | अंगणवाडी पुरक पोषण आहार पुरविणे. | ६००००/- | ग्रामनिधी २०२५-२०२६ | | ६ महिने |
| ६. | पिण्याच्या पाण्याचे २० लीटरचे १५० नग जार खरेदी करणे. | ३५०/- प्रति नग | ग्रामनिधी २०२५-२०२६ | | ६ महिने |
| ७. | ३००० कि.ग्रॅ. शेवाली पावडर खरेदी करणे. | ५०/- प्रति किग्रॅ | ग्रामनिधी २०२५-२०२६ | | ६ महिने |
| ८. | ग्रामपंचायत हद्दीतील माडप गाव, माडप कातकरीवाडी, माडप वाडी, माडप बौद्धवाडी, माडप वाडी, येथील फिल्टर प्लांट दुरुस्ती करणे, | ५५,२२४/- | ग्रामनिधी २०२५-२०२६ | ५५२/- | ६ महिने |
| ९. | पंप हाऊस येथील विहिरीमध्ये नादुरुस्त झालेला पंप विहिरीतून काढुन त्या ठिकाणी रिपेअर असलेला चालु पंप बसविणे.. | ६२,३०४/- | ग्रामनिधी २०२५-२०२६ | ६२३/- | ३ महिने |
| १०. | नादुरुस्त झालेला पंप दुरुस्ती करुन नळ पाणीपुरवठा योजनेच्या विहिरीमध्ये बसविणे, | ५०,०००/- | ग्रामनिधी २०२५-२०२६ | ५००/ | ३ महिने |

**अटी शर्ती :-**
१. सदर कामाची कोरी निविदा दिनांक ०४/०७/२०२५ ते ११/०७/२०२५ पर्यंत सुट्टीचे दिवस वगळून उपलब्ध होतील.
२. निविदे सोबत एक टक्का इसारा रक्कम रोखीने ग्रामंपचायत मध्ये सामान्य पावतीने भरणा करावी.
३. निविदा मंजुर झालेल्या ठेकेदाराला ५०० रु. च्या बौड पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल,
४. सदरचे काम पंचायत समितीकडील संबधित तांत्रिक आधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली व ग्रामपंचायतीच्या देखरेखेखाली पुर्ण करण्याचे आहे.
५. काम पुर्ण झाल्यावर कामाच्या बिलातून ५ टक्के सुरक्षा अनामत, २ जी.एस.टी., २ टक्के आयकर, १ टक्का कामगार कल्याण, १ टक्का कामगार विमा इत्यादी रकमा कपात केल्या जातील,
६. ठेकेदार हा अनुभवी व GST धारक असावा.
७. सुरक्षा अनामत रक्कम कामाचा दर्जा पाहुन ६ महिन्याने परत केली जाईल.
८. कामाचे वेळी काही जीवीतहानी झाल्यास त्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.
९. काम सुरु करण्यापुर्वीचे फोटो, काम सुरु असतानाचे फोटो व काम पुर्ण झाल्यानंतरचे फोटो सादर केल्याशिवाय बिलाची रक्कम अदा केली जाणार नाही.
१०. पोस्टाने आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाही

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत माडप**
**ता. खालापुर, जि. रायगड**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत माडप**
**ता. खालापुर, जि. रायगड**

## जाहिर नोटीस

तमाम लोंकास कळविण्यात येते की, **श्री. आत्माराम सुदाम भगत,** वय ७९ वर्षे, पत्ता घर नं. २४२, पाकट माळा भगत आळी, सेक्टर १-ई, कळंबोळी गाव, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६, यांना सिडको लि. यांनी लागू केलेल्या १२.५ टक्के भुखंड वाटप केलेला असुन सदरहू भुखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**वाटप करण्यात आलेल्या भुखंडाचे वर्णन**
**नोड कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड**

| नोड | भुखंड क्र. | सेक्टर | क्षेत्र (चौ. मी.) |
|---|---|---|---|
| कामोठे | ०४ | ६ए | १४४९.८२ |

वरील भुखंडामधील **श्री. आत्माराम सुदाम भगत** यांनी त्यांचा अविभक्त हिस्सा त्यांचे भाऊ **श्री. मिलिंद आत्माराम भगत, व श्री. वैभव आत्माराम भगत,** यांना बक्षिसपत्राद्वारे हस्तांतरीत करत आहेत. तरी या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, या भुखंडाचा बक्षिसपत्राद्वारे हस्तांतरणाचा व्यवहार माझे अशिल **श्री. मिलिंद आत्माराम भगत, व श्री. वैभव आत्माराम भगत,** यांनी केला असून सदर व्यवहार हा **श्री. आत्माराम सुदाम भगत** यांच्यावर बंधनकारक आहे व सदर कराराची पूर्तता **श्री. आत्माराम सुदाम भगत** करून देणे त्यांचेवर बंधनकारक आहे. तत्पूर्वी सदर कराराची पूर्तता करणे, तसेच सदर भुखंड हस्तांतरित करण्यापूर्वी तो निर्वेध, बिनकर्जी. बोजारहित व निजोखमी असणे आवश्यक आहे. जर सदरहू भुखंडावर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध असल्यास ही जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून (१५) पंधरा दिवसांचे आत खालील पत्यावर लेखी पत्रानिशी कळवावे. जर वरील मुदतीत कोणांकडूनही, कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आली नाही तर सदरहू भुखंडाचा बक्षिसपत्राद्वारे हस्तांतरणाचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल यांची नोंद घ्यावी,

कळावे.

**सही/-**
**श्री- योगेश स. बाष्टे,**
**(ॲडव्होकेट)**

पत्ता : ऑफिस क्रं. ७, तळमजला, जयनारायण को हौ. सो. लि., गावदेवी मंदिराजवळ, पनवेल, जि. रायगड ४१०२०६ मो- नं ८८९८१२१९७१

## Public Notice

This is to inform in general that Civil Misc. Application is pending in Panvel Civil Court bearing Civil M.A. No. 201/2023

This civil M.A. has been filed by Anita Ravindra Patil resident of Flat No. 603, Plot No. 422, Shri Siddhi Vinayak Complex, 6th Floor, Panvel, Dist. Raigad, Maharashtra.

I have come to know that Anita Ravindra Patil is trying to sale the property of the above mentioned flat, which is in the name of Ravindranath Sham Patil (deceased) ex-employee of ONGC, Uran, District Raigad. It is therefore informed the public in general not to get interested in the property mentioned above as the case is pending for declaration of succession certificate from the court.

Hence this notice.

**sd/-**
**Adv. B. D. Tripathi**
**(MAH/1048/1996)**
**Mumbai High Court & Supreme Court**
**Talegaon Dabhade, Pune Mobile No. 7900126522**

## PANVEL MUNICIPAL CORPORATION
**TENDER NOTICE**
**Tender No: PMC/CE/PMAY/52/2025-26**
**CITY ENGINEER'S OFFICE (PMAY DEPARTMENT)**

**INVITATION OF TENDER FOR THE WORKS OF** "Mixed Use Development under PMAY with Rehabilitation Of Slum Dwellers Of Plot No. 307A At. Panvel, Shivajinagar, Dist. Raigad, Maharashtra 410206 "

Offers by way of e-tendering (Lump Sum PPP form) are invited by the Commissioner, Panvel Municipal Corporation from contractors in e-tendering system for following works.

| Name of work | Amount of E.M.D (Rs) | Time limit in Calendar months | Cost of Tender Document(Rs.) |
|---|---|---|---|
| Mixed Use Development under PMAY with Rehabilitation Of Slum Dwellers Of Plot No. 307A At. Panvel, Shivajinagar, Dist. Raigad, Maharashtra 410206 | Rs. 12,50,000/- | 36 Months (Including Monsoon) | Rs.5,000/- +18% GST Total Rs.5900/- (Non refundable) |

The details of above works, such as Security Deposit, Earnest Money Deposit, Terms & Conditions of the Tender are available on website www.mahatenders.gov.in Tenders for these works are to be submitted by e-tendering system. Bidders can avail the e-tender document **from 04/07/2025 from 5.00 P.M. to 24/07/2025 up to 5.00 PM.** Bidders should submit their offer by way of e-tendering system only. The last date of Submission by way of e-tendering will be **25/07/2025 up to 3.00 PM.** Commissioner, Panvel Municipal Corporation reserves the right to accept or reject any or all tender without giving any reason thereof.

**जा.क्र :-पमपा/जनसंपर्क./३१२५/**
**प्र.क्र. ३०६/३१२/२०२५**
**दिनांक :- ०२/०७/२०२५**

**Sd/-**
**Additional Commissioner-I**
**Panvel Municipal Corporation,**
**Panvel-410 206**

## पाहिजेत

अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन अल्पसख्याक मुलीचे वस्तीगृह पनवेल साठी निव्वळ कंत्राटी पद्धतीने तात्पुरत्या स्वरुपात भरती करणेसाठी खालील पदासाठी अर्ज मागवण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | संख्या | किमान पात्रता | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | अधीक्षक | १ | कोणत्याही शाखेचा पदवीधर व संगणक ज्ञान | महिला उमेदवार राखीव |
| २ | लिपिक | १ | दहावी पास टंकलेखन व संगणक ज्ञान आवश्यक | महिला उमेदवार राखीव |
| ३ | शिपाई | १ | किमान चौथी पास | महिला उमेदवार राखीव |
| ४ | सफाई कामगार | २ | किमान चौथी पास | महिला उमेदवार राखीव |
| ५ | पहारेकरी | ४ | किमान चौथी पास | महिला उमेदवार राखीव |

सदर पदाकरिता कंत्राटी पद्धतीने मानधन शासन निर्णय / वस्तीगृह -२०१२ /प्र.क्र १६८ /का ८ मंत्रालय मुंबई २१/०६/२०१३ अन्वये राहील, सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या (mdd. maharashatra. gov.in) वर उपलब्ध आहे. संपूर्ण अर्ज माहितीसह तसेच साक्षांकित प्रमानपत्रासह स्वीकारण्याचा अंतिम दिनांक १३/०८/२०२५ असून मुलाखतीसाठी शुक्रवार दिनाक १५/०८/२०२५ रोजी दुपारी १.०० वाजता उपस्थित राहावे.

**पता - शासकीय अल्पसख्याक मुलीचे वस्तीगृह पनवेल**
**प्राचार्य - शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल**
NH-4, **एस. टी स्टैंड जवळ, पनवेल.**

**Sd/-**
**Minority Girls Hostel**

## कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नवीन प्रशासकीय ईमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन - ४२१५०३, ता. अंबरनाथ जि.ठाणे.
ई-मेल: coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in, वेबसाइट: kbmc.gov.in.

**जा.क्र. : कुबनप/साबां/५२७/२०२५-२६** **दिनांक :- ०२/०७/२०२५**

### जाहीर ई-निविदा सूचना क्र. ३२/२०२५-२६

कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत नगरपरिषद निधीतील १३ विकास कामांसाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून टक्केवारी दराच्या ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सदर ई-निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि.०४/०७/२०२५ ते दि.११/०७/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत असून दि.०८/०७/२०२५ रोजी दुपारी १२.०० वा निविदा पुर्व बैठक नगरपरिषद कार्यालयात आयोजित केलेली आहे. तसेच सदरची ई-निविदा दि. १४/०७/२०२५ रोजी दुपारी. १२.०० वाजल्यानंतर उघडण्यात येतील.

निविदेबाबतचा सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या http://kbmc.gov.in तसेच शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर व नगरपरिषदेच्या सुचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

**सही/-**
**(मारुती गायकवाड)**
मुख्याधिकारी तथा प्रशासक
कुळगांव बदलापूर नगरपरिषद, कुळगांव

# नवी मुंबईत सफाई अपनाओ, बिमारी भगाओ!

## अभियानांतर्गत विविध उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

केंद्र सरकारमार्फत १ जुलै ते ३१ जुलै कालावधीत 'सफाई अपनाओ – बिमारी भगाओ' अभियान राबविण्यात येत असल्याचे जाहीर करण्यात आले असून त्यास अनुसरून महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महानगरपालिकेने विविध उपक्रमांचे नियोजन केले आहे.

यानुसार उद्यान विभागाच्या वतीने सेक्टर १९ धारण तलावाच्या परिसरात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यामध्ये उद्यान विभागाच्या परिमंडळ २ उपायुक्त नयना ससाणे, परिमंडळ २ चे उपायुक्त संजय शिंदे यांच्या माध्यमातून स्वच्छताप्रेमी नागरिक तसेच विद्यार्थ्यांच्या सहभागातून धारण तलावाचा परिसर स्वच्छ करण्यात आला.

अशाच प्रकारे ऐरोली येथील स्व.राजीव गांधी उद्यानाचीही सखोल स्वच्छता करण्यात आली. यामध्ये दोन्ही उपआयुक्तांसह सहा.उद्यान अधिकारी



भालचंद्र गवळी, उद्यान अधिकारी विजय कांबळे आणि उद्यान विभागातील कर्मचारी नागरिकांसह सहभागी झाले होते.

बेलापूरमध्येही डॉ.केशव बळीराम हेडगेवार उद्यान अर्थात प्रचलित मँगो गार्डनमध्येही उद्यान विभागाचे परिमंडळ १ उपायुक्त किसनराव पलांडे तसेच बेलापूर विभागाचे सहा.आयुक्त डॉ.अमोल पालवे, उद्यान विभागाच्या सहा.आयुक्त ऋतुजा गवळी, उद्यान अधिक्षक प्रकाश गिरी यांच्या प्रत्यक्ष सहभागातून तसेच बचत गटातील महिला व नागरिक यांच्या सहयोगातून उद्यानाची सखोल स्वच्छता करण्यात आली.

ऐरोली येथील राजमाता जिजाऊ रूग्णालयात स्वच्छता जागृती मोहीम राबविण्यात आले. यामध्ये रूग्णालय स्वच्छतेप्रमाणेच वैयक्तिक स्वच्छता, परिसर स्वच्छता याचे महत्व रूग्णाचे नातेवाईक तसेच उपस्थित नागरिकांना सांगण्यात आले. पावसाळा कालावधीत किटकजन्य आजाराचे प्रमाण रोखण्यासाठी घर व घराच्या परिसरातील डासउत्पत्ती स्थाने नष्ट करण्यासाठी घ्यावयाची काळजी आणि करावयाच्या उपाययोजना याचीही माहिती नागरिकांना देण्यात आली. ऐरोली विभागाचे सहा.आयुक्त सुनिल काठोळे, रूग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ.रवींद्र म्हात्रे, मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे यांचेसह ऐरोली विभाग कार्यालय व राजमाता जिजाऊ रूग्णालय येथील कर्मचाऱ्यांनी या मोहीमेत विशेष सहभाग घेतला.

'सफाई अपनाओ – बिमारी भगाओ' अभियानाच्या अनुषंगाने महिनाभराच्या कालावधीत स्वच्छता आणि आरोग्य विषयक नानाविध उपक्रम राबविले जात असून यामध्ये लोकसहभागावर विशेष भर दिला जात आहे.

# गायवर्गीय प्राण्यांचे जंत निर्मूलन

- पनवेल महानगरपालिकेचा अभिनव उपक्रम
- पशुवैद्यकीय विभागाकडून पांजरपोळमध्ये शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागामार्फत पनवेल येथील १०० वर्ष जुन्या पांजरपोळ येथे जंत निर्मूलन व आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात एकूण ७९ गायवर्गीय प्राण्यांचे जंत निर्मूलन करण्यात आले.

या शिबिरात गायींच्या जंत निर्मूलनासोबतच आरोग्य तपासणी, उपचार, तसेच ३० गायींची गर्भतपासणी व वंध्यत्व तपासणीदेखील करण्यात आली. या वेळी गाभण, वंध्यत्वाने त्रस्त आणि दुर्बल गायींकरिता क्षार मिश्रण व कॅल्शियम टॉनिकचे मोफत वाटप करण्यात आले.

उपायुक्त डॉ. वैभव विधाते व मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ.



आनंद गोसावी या सूचनेप्रमाणे घेण्यात आलेल्या या शिबिरासाठी पशुवैद्यकीय विभागातील तज्ज्ञ अधिकारी डॉ. भगवान गिते, डॉ. मधुलिका लाड, पांजरपोळचे उपाध्यक्ष नितीन मुनोत, डॉ. लाजरी पावसकर, डॉ. राधिका आव्हाड, तसेच पशुसंवर्धन विभागाचे डॉ. समीर तोडणकर, डॉ. मुकेश मर्चंडे, डॉ. आनंद मारकवार आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.

पनवेल महापालिकेच्या या अभिनव उपक्रमामधून पशुधनाच्या आरोग्य संवर्धनास चालना मिळून स्थानिक पशुपालकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे.

# पीरवाडी येथील आदिवासी महिलांसाठी उपक्रम

## आरोग्य तपासणी व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

**उरण : प्रतिनिधी**

श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहाय्यता संस्था व शिवराज युवा प्रतिष्ठान उरण यांच्या संयुक्त विद्यमाने उरण आदिवासी कातकरीवाडी पिरवाडी येथील महिलांना जीवनावश्यक वस्तूचे वाटप करण्यात आले. महिला व लहान बालकांची आरोग्य तपासणी करून मोफत औषधे वाटप करण्यात आली. ३८ गरजू महिला व बालक रुग्णांनी या आरोग्य तपासणीचा लाभ घेतला.

या उपक्रमाला जनतेचा उत्तम प्रतिसाद लाभला असून या कार्याचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

शिवराज युवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष संदेश ठाकूर, समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्था कार्याध्यक्ष संगिता ढेरे, कविता म्हात्रे ,पूजा प्रसादे, मिना रावल, विशाखा म्हात्रे, अनघा ठाकूर, रश्मी तांबे, सीमा निकम, सुमन तोगरे, तृप्ती भोईर, श्रेया ठाकूर, योगेश म्हात्रे, उमेश वैवडे , सचिन ढेरे,केशव निकम, दिनेश हळदणकर, अमर ठाकूर, आनंद ठक्कर, घनश्याम भोईर, सुभाष पाटील, संग्राम तोगरे, दिपक प्रसादे या सर्वांचे सहकार्य या उपक्रमाला लाभले आहे.



# वीर वाजेकर महाविद्यालयात पदवी वितरण समारंभ

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेचे, उरण तालुक्यातील फुंडे येथील वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात पदवी वितरण समारंभ बुधवारी (दि. २) झाला. शैक्षणिक वर्षे २०२३–२४ मध्ये विविध शाखेतून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मुंबई विद्यापीठाची पदवी प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी प्राचार्य डॉ.आमोद ठक्कर यांनी मनोगतातून सांगितले की, महाविद्यालयाचा निकाल हा ९० टक्क्यांपेक्षा जास्त लागलेला आहे, प्राध्यापक संशोधन कार्यामध्ये अग्रेसर आहेत मुलंही संशोधन कार्यात सक्रिय सहभाग



घेतात मुलांसाठी ३४ शॉर्ट टर्म कोर्स उपलब्ध आहेत. सुसज्ज आ यटी लॅब लँग्वेज लॅब जिमखाना उत्कृष्ट ग्रंथालय अशा सुविधा विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहेत.

प्रमुख पाहुणे जीबू कुरिअन ईटी, सी.ई.ओ. (डी.पी.वर्ल्ड, न्हावा शेवा) यांनी आपल्या मनोगतातून नव्वदच्या दशकातील शिक्षण आणि नोकरीच्या संधी यावर प्रकाश टाकला. त्याचबरोबर ते म्हणाले की आजचा विद्यार्थी हा अधिक चौकस, सजग आहे नव्या तंत्रज्ञानाने तो परिपूर्ण असल्याने आजच्या स्पर्धेच्या युगात तो चांगली व उत्तम नोकरी शोधू शकतो. आम्ही आमच्या बंदरात अशा प्रकारच्या हुशार विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त अनुभवाच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करू. विद्यार्थ्यांना लागणाऱ्या गरजेच्या सर्व सुविधा देण्याचा आमचा प्रयत्न आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा कोर्स सर्व विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात येत आहे याची माहिती दिली. पदवीधर झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून भावी काळासाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य सुधीर घरत, महाविद्यालय विकास समिती सदस्य भावना घाणेकर, उपप्राचार्य गजानन चव्हाण, उपप्राचार्य, प्रो.अनिल पालवे, उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. श्रेया पाटील व डॉ.सुजाता पाटील यांनी केले.

प्रा.संतोष देसाई, अध्यक्ष, पदवी वितरण समारंभ समिती यांनी आभार मानले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक तसेच सर्व पदवी प्राप्त विद्यार्थी उपस्थित होते.

दरम्यान, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व 'रयत'चे उपाध्यक्ष पी.जे. पाटील यांनी या कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या.

# उरणमधील पुनाडे येथे चारसूत्री पद्धतीने भाताची लागवड

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) सन २०२५–२६ अंतर्गत रत्नागिरी ८ या ८०० किलो वाणाचे वाटप करण्यात आले असून या बियाणाची ५० ऐकर क्षेत्रावर चारसुत्री पदधतीने कृषी विभाग उरण यांच्या वतीने भात लागवडीचे नियोजनदेखील करण्यात आले.

दरम्यान, उरण तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ – नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी (दि.३) पुनाडे येथील शेतकरी मुरलीधर तांडेल यांच्या शेतात रत्नागिरी ८ या वाणाची चारसूत्री पद्धतीने भात लागवड करण्यात आली आहे. यावेळी परीससातील २५ ते



३० शेतकऱ्यांनी या चारसूत्री पद्धतीचा अनुभव घेतला.

या वेळी कृषी सहाय्यक अधिकारी सुरज घरत व बी टी एम नमिता वाकळे यांनी चारसुत्री लागवड कशी फायद्याची असते याविषयीचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. चारसुत्री भात लागवड केल्याने पिक व्यवस्थापन करणे सोपे जाते तसेच रोपांची संख्या कमी लागत असल्यामुळे रोपांची बचत होते. चारसुत्री पदधतीमध्ये भात रोपांची लागवड विशिष्ट अंतरावर केली जाते. त्यामुळे हवा खेळती राहते व रोपांना जसा हवा तसा सुर्यप्रकाश मिळतो. या पद्धतीत भातपिक किड रोगाला बळी पडण्याची शक्यता कमी असते.

तसेच औषध फवारणी करण्यास आणि तण काढण्यास देखील सोयीस्कर होते. खताच्या व मजुरांच्या खर्चातही बचत होते. भाताची चांगली वाढ होऊन भाताचे उत्पादन वाढते.पारंपारीक भात लागवडीने भाताचे उत्पादन कमी प्रमाणात मिळते. विशेषता: उरण तालुक्यातील शेतकऱ्यांनी चालू खरीप हंगामात चारसुत्री पदधतीने लागवड करावी, असे आवाहन उरण तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ – नारनवर यांनी यावेळी शेतकऱ्यांना केले.

# 'सीकेटी'च्या नृत्यांगनेचे राष्ट्रीय स्पर्धेत यश; लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ऑल इंडिया आर्टिस्ट असोशिएशनतर्फे ऑल इंडिया ७०व्या राष्ट्रीय नृत्य स्पर्धा आणि उत्सव २०२५ आयोजित नृत्य स्पर्धेत सीकेटी विद्यालयातील विद्यार्थिनी नृत्यांगनेने बाजी मारली आहे. याबद्दल तिचे विद्यार्थ्यांनीचे जर्नादन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले.

६ ते १० जून २०२५ रोजी शिमला, हिमाचल प्रदेश येथे झालेल्या या स्पर्धेत सी.के.ठाकूर इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थीनी



यतिशा अमोल शेलार (इ. ८ वी) नृत्य सादर केले. ज्युनिअर गटात या विद्यार्थिनींनी द्वितीय क्रमांक पटकावला आहे. ही विद्यार्थिनी गुंज डान्स अकादमी या संस्थेत नृत्य प्रशिक्षण घेत आहेत.

विद्यार्थ्यांनीचे अभिनंदन करताना लोकनेते रामशेठ ठाकूर सचिव डॉ. एस. टी गडदे, मुख्याध्यापक संतोष चव्हाण, मुख्याध्यापिका निलिमा शिंदे उपस्थित होते.

# पनवेल महापालिकेच्या पुनर्वापरयोग्य कचरा संकलन केंद्रांचे उद्‌घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवीमुक्त दिनानिमित्त पनवेल महानगरपालिकेच्या वतीने गुरुवारी (दि.३) नवीन पनवेलमध्ये मिलन सोसायटी, नीलवर्धमान सोसायटी, मेलडी टॉवर या तीन ठिकाणी पुर्नवापरयोग्य प्लास्टिक व ई–कचरा संकलन केंद्रांचे सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले.

पनवेल महापालिकेच्या वतीने पुर्नवापर योग्य कचरा संकलन केंद्र उभारणीचा अभिनव उपक्रम राबविला जात असून कचरा वर्गीकरण, पुर्नवापर आणि पर्यावरण संवर्धनास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला आहे. पुढील काळात महापालिकेच्यावतीने विविध ठिकाणी याच पध्दतीने पुर्नवापरयोग्य प्लास्टिक व ई–कचरा संकलन केंद्र उभारण्यात येणार आहे.



नागरिकांनी प्लास्टिक कचरा, ई कचरा, सरसकट घरातील कच–यात न फेकून देता, महापालिकेच्या या पुर्नवापरयोग्य प्लास्टिक व ई–कचरा संकलन केंद्रांमध्ये जमा करावा, असे आवाहन घनकचरा व स्वच्छता विभागाचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी केले आहे.

पनवेल महापालिकेचा हा अभिनव उपक्रम पर्यावरणपूरक शहराच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल असून नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

**नागरिकांना आवाहन**

पुर्नवापरयोग्य प्लास्टिक व ई–कचरा संकलन केंद्रांमध्ये प्लास्टिक कचरा, ईकचरा, प्लास्टिक कचरा, बाटल्या, पिशव्या, कंटेनर, पॅकेजिंग साहित्य, तुटलेली प्लास्टिक उत्पादने या वस्तू संकलित करण्यात येणार आहेत. तर ई–कचरा: मोबाईल फोन, चार्जर, केबली, बॅटरी, इअरफोन, रिमोट, बल्ब, लहान इलेक्ट्रॉनिक उपकरणे आहेत. ओला कचरा, वैद्यकीय कचरा, काच व धातूची वस्तू, मोठी इलेक्ट्रॉनिक उपकरणे, घातक कचरा या पेट्यांमध्ये टाकू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कृषी दिन आणि रानभाजी महोत्सव



**उरण : वार्ताहर**

कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र शासन कृषी विभाग व पंचायत समिती, उरण यांच्या संयुक्त विद्यमाने उरण तालुक्यातील पाले येथे कृषी दिन व रानभाजी महोत्सव साजरा करण्यात आला.

या वेळी पनवेलच्या खारभूमी संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञ डॉ. वाहने, उरण तालुका कृषी अधिकारी आर.टी.नारनवर, एस. डी. गटकळ यांनी मनोगत व्यक्त केले व विविध योजनेबद्दल आणि भात पीक लागवड संदर्भात मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास कृषी विस्तार अधिकारी एस.एन.भोणकर, आवरे ग्रामपंचायत प्रशासक काळे, आवारे ग्रामसेवक नागे मॅडम, माजी सरपंच आवरे एन.एस.पाट, माजी सरपंच गोवठणे पी.व्ही.म्हात्रे तंटा मुक्ती अध्यक्ष प्रशांत म्हात्रे तसेच कृषी विभागाचे सर्व सहायक कृषी अधिकारी व प्रगतशील शेतकरी मोठ्या संख्येत उपस्थित होते. कृषी दिनानिमित्त वृक्ष लागवड करण्यात आले.

# नेरूळमधील बँक ऑफ इंडिया ऑफिसर्स कॉलनीत वृक्षारोपण

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ येथील बँक ऑफ इंडिया ऑफिसर्स कॉलनीमध्ये पर्यावरण संवर्धनासाठी एक प्रेरणादायी उपक्रम राबवण्यात आला. कॉलनीतील नागरिकांनी तसेच लहान मुलांनी एकत्र येत १०० हून अधिक वृक्षांची लागवड केली. या उपक्रमाचे नेतृत्व बँकेचे वरिष्ठ अधिकारी विभव आकाश यांनी केले.

त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ही केवळ झाडे लावण्याची कृती नाही, तर स्वच्छ



आणि हरित भविष्यासाठी आपला सामूहिक संकल्प असल्याचे स्पष्ट केले. तसेच बँक ऑफ इंडिया परिवार नेहमीच पर्यावरणप्रेमी व सामाजिक बांधिलकी जपणारा राहिला आहे, असेही त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमात सहायक महाप्रबंधक अनुराग तसेच मनोज, चंद्रशेखर, प्रमोद, विकास डी. सिंह, पंकज, रणधीर, अमन, अपूर्व, सागर सिन्हा, अविनाश, अनामिका, नूतन, फैज, राजपुत्रा आणि साहू यांनी उत्साहाने सहभाग घेतला. या वृक्षारोपण उपक्रमामध्ये लहान मुलांचा उल्लेखनीय सहभाग होता. कॉलनीमधील एकोप्याचे व सामाजिक सलोख्याचे दर्शन या वेळी घडले.

# रेवदंडा समुद्र किनारी झाडांवर गंडांतर

**वालुकामय जमिनीच्या उत्खननामुळे वृक्ष उन्मळून पडले**



**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा मोठे बंदर समुद्र किनारी समुद्राच्या उधाणाने वालुकामय जमिनीचे मोठ्या प्रमाणात उत्खन्नन झाल्याने किनारी लगतची जुनी झाडे उन्मळून पडली व परिसरातील स्थानिक घराना यापुढे समुद्र भरतीच्या पाण्याचा धोका संभवतो आहे.

ऐन पावसात समुद्र भरतीचे वेळी रेवदंडा मोठे बंदर किनारी कुंडलिका समुद्र खाडीचे पाण्याची पातळी वाढल्याने तेथील वाळूचे समुद्र भरती पाण्याने उत्खन्नन झाले. या समुद्राच्या भरती पाण्यात तेथील वाळू वाहून गेल्याने मोठे बंदर परिसरात लावण्यात आलेली सुरू झाडे तसेच स्थानिक घराचे सभोवताली व परिसरात सावलीसाठी लावण्यात आलेली मोठी अनेक वृक्ष उन्मळून पडले.

यामुळे भविष्यात समुद्राचे उधाणाचे पाणी तेथील परिसरातील घरात शिरण्याचा संभवना झाली आहे. कुंडलिका समुद्र खाडीने येथील पाण्याचा जोर उधाणाचे वेळी मोठा असतो. त्यामुळे तेथील वाळू उत्खन्नन झाले असल्याची निदर्शनास येते, मात्र संबंधितांनी येथे कोणत्याही प्रकारची पहाणी केली नसल्याचे म्हटले जाते.

रेवदंडा मोठे बंदर परिसरात शासनाचे वतीने सुरक्षीत बंधारा उभारण्यात यावा त्यामुळे उधाणाचा पाण्यापासून स्थानिक घरांना संरक्षण मिळेल, असे नंदु बळी यांनी मागणी केली आहे.

## निवडक

### नौदलातील रोजगारावर आज मार्गदर्शन

**अलिबाग :** सरखेल कान्होजी राजे आंग्रे यांच्या २९६व्या पुण्यतिथीनिमित्त गाज फाउंडेशन आणि राष्ट्रीय केमिकल आणि फर्टिलायझर्स लिमिटेड (आरसीफ) यांच्या संयुक्त विद्यमाने करिअर मार्गदर्शन कार्यक्रम होणार आहे. यात नौदलातील रोजगार संधी या विषयावर कमांडिंग ऑफिसर दीपक सिंगल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती गाज फाउंडेशनचे अध्यक्ष रघुजीराजे आंग्रे यांनी दिली. या वेळी डॉ. निशिगंध आठवले उपस्थित होते. शुक्रवारी (दि.४) सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत करण्यात आले असून, आरसीएफ कम्युनिटी हॉल, सरखेल कान्होजी आंग्रे नगर, कुरूळ, अलिबाग येथे तो पार पडणार आहे.

### खोपोली येथे पर्यावरण सप्ताह




**खालापूर :** माजी नगराध्यक्ष सुनील पाटील व शिव उद्योग सेना जिल्हाप्रमुख हरीशजी काळे यांच्या हस्ते खोपोली येथे वृक्षांचे रोपण व वाटप तसेच बुज हास्य परिवारचा पर्यावरण सप्ताह अंतर्गत १००० रोपे वाटप करून वृक्षारोपण सोहळा साजरा करण्यात आला. या वेळी बुज हास्य साधक बंधू भगिनी.. सहभागी झाले होते. बुज हास्य संस्थापक बाबुभाई ओसवाल यांच्या नेतृत्वाखाली १००० रोपे लावून भव्यदिव्य पर्यावरण सप्ताह निमित्त हे आयोजन करण्यात आले होते. बुधवारी हनुमान मंदिर जवळ, खोपोली शिळफाटा मार्ग येथे हा कार्यक्रम झाला. त्यानिमित्त बाबुभाईंचा सत्कार डॉ.सुनील पाटील व उद्योजक हरीश काळे यांच्या हस्ते करण्यात आला.

### मध्य रेल्वेच्या कर्मचाऱ्यांना पुरस्कार

**रोहे :** मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धर्म वीर मीना यांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमात मध्य रेल्वेच्या नऊ कर्मचाऱ्यांचा ज्यामध्ये मुंबई विभागातील दोन, सोलापूर विभागातील तीन, नागपूर विभागातील दोन आणि पुणे आणि भुसावळ विभागातील प्रत्येकी एक कर्मचाऱ्यांचा संरक्षा पुरस्कार देऊन गौरव केला आहे. मागील महिन्यात संबंधित कर्मचाऱ्यांनी कर्तव्यादरम्यान दाखवलेल्या सतर्कतेबद्दल, अनुचित घटना टाळण्यात आणि रेल्वे वाहतुकीत सुरक्षितता सुनिश्चित करण्यात दिलेल्या योगदानाबद्दल संरक्षा पुरस्कार प्रदान करण्यात आले. प्रत्येक पुरस्कारात पदक, प्रशंसापत्र, अनुकरणीय संरक्षा कार्याचे प्रशस्तिपत्र आणि रोख २००० रक्कम समाविष्ट आहे.

## नेरळमध्ये डॉक्टर डेनिमित्त आरोग्य नेत्र तपासणी व रक्तदान शिबिर

**कर्जत : प्रतिनिधी**



डॉक्टर डेनिमित्त रायगड मेडिकल असोसिएशन व कर्जत मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने नेरळ येथे रक्तदान, सामान्य आरोग्य तपासणी व नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरास १०० पेक्षा जास्त नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला, तर ४५ जणांनी रक्तदान केले.

धारप सभागृहामध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, कार्यक्रमाची सुरुवात भगवान धन्वंतरी व गणपती पूजनाने झाली. यानंतर दीपप्रज्वलन, स्वागत भाषण व मार्गदर्शनपर मनोगते झाली.

रायगड मेडिकल असोसिएशन (सचिव डॉ. प्रशांत गांगल यांनी उपस्थितांचे स्वागत केले, तर अध्यक्ष डॉ. आशुतोष कुळकर्णी यांनी अध्यक्षीय प्रास्ताविक करत उपक्रमाच्या उद्दिष्टांवर प्रकाश टाकला डॉ. आशिष कर्वे यांनी दोन्ही संघटनांच्या सामूहिक प्रयत्नांची प्रशंसा केली.

सायकल वारीतील उल्लेखनीय सहभागासाठी डॉ. नागेश चित्ते व डॉ. शरद तोडमल यांचा सन्मान करण्यात आला. आरोग्यम धनसंपदा जीवनगौरव पुरस्कारप्राप्त डॉ. प्रेमचंद जैन यांचाही गौरव करण्यात आला. या वेळी ४५ जणांनी उत्साहाने रक्तदान केले.

या उपक्रमात अनील आय हॉस्पिटल, रायगड मेडिकल सेंटर ब्लड बँक, आणि लार्सन टुब्रो ट्रस्टचे डॉ. संजय भामेरे, तसेच कर्जत मेडिकल असोसिएशन चे डॉ दिलीप सावळे डॉ. आदिती कर्वे, डॉ. शीतल कराळे, डॉ. शर्वाणी कुळकर्णी, डॉ. विकास गोमारे, डॉ. महेश शिरसाट, डॉ. निलेश म्हात्रे, डॉ. आदित्य जंगम, डॉ. हेमंत शेवाळे, डॉ. गणेश साळुंखे, डॉ. श्रीकांत डहाके, डॉ. सुहास शितुत, डॉ. बी. जी. लाड व डॉ. गंगोलिया यांनी सक्रिय सहभाग घेतला. सूत्रसंचालन डॉ. कुणाल राठोड यांनी तर आभारप्रदर्शन डॉ. जयश्री देशमुख यांनी केले.

## यांत्रिक पद्धतीने भाताची लागवड करा

**कृषी विभागाचे आवाहन**

**कर्जत : प्रतिनिधी**



कर्जत तालुक्यामध्ये सध्या भात शेती करताना मजुरांची टंचाई भासत असून दिवसेंदिवस यामुळे शेती करणे अधिक अवघड होत चालले आहे. या पार्श्वभूमीवर, भात लागवड अधिक सुलभ आणि खर्चिकदृष्ट्या किफायतशीर व्हावी यासाठी यांत्रिक पद्धतीने भात लागवड करा, असे कृषी विभागाकडून आवाहन करण्यात आले आहे.

मुगपे येथील शेतकऱ्यांचे बागेत यांत्रिक भात लागवडीसाठी ट्रेमध्ये रोपे तयार करण्याच्या प्रक्रियेचे प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले होते. ही प्रात्यक्षिक कार्यशाळा तालुका कृषी अधिकारी शिंदे, प्रगत शेतकरी असीमकुमार सेन यांच्या माध्यमातून आयोजित केली होती.

या वेळी उपविभागीय कृषी अधिकारी खोपोली सुनील निंबाळकर, तालुका कृषी अधिकारी कर्जत हेमांगी सपकाळे, मंडळ कृषी अधिकारी कर्जत दिनेश कोळी, उपकृषी अधिकारी शशिकांत गोसावी, सचिन केणे, मंगेश गलांडे, किरण गंगावणे आणि सहाय्यक कृषी अधिकारी श्रद्धा देवकर आदी उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये यांत्रिक पद्धतीने भात लागवडीसाठी ट्रेमधून रोपे तयार करण्याचे सविस्तर मार्गदर्शन व प्रात्यक्षिक दाखवले. ही संधी आपल्या शेतीच्या उत्पादनक्षमतेत वाढ करण्यासाठी निश्चितच उपयुक्त ठरेल. यांत्रिकीकरण द्वारे भात पिकाची लागवड करण्याच्या दृष्टीने ट्रे मध्ये रोपे तयार करण्यासाठी प्रात्यक्षिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते. आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने भात शेतीत कार्यक्षमतेत वाढ, मजुरांवरील अवलंबित्व कमी करणे आणि वेळ आणि श्रम वाचवणे शक्य झाले आहे.

या कार्यशाळेत तालुक्यातील सुमारे १५० शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. प्रात्यक्षिकाद्वारे शेतकऱ्यांना ट्रेमधून भात रोपे तयार करण्याची प्रक्रिया, मशीनद्वारे रोपांची लावणी, तणनाशक फवारणीतील यांत्रिकी मदत, तसेच भात कापणीतील आधुनिक यंत्रसामग्रीचे फायदे यासंदर्भातील माहिती दिली गेली. आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने भात शेतीत यांत्रिकीकरणाचा वापर वाढविण्याच्या दृष्टीने ट्रेमध्ये भात रोपे तयार करण्याबाबतची कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली होती.

## माणगाव तालुक्यातील विविध शाळांना वह्यावाटप

**माणगाव : प्रतिनिधी**

सामाजिक कार्यकर्ते तथा एडब्लूपीएल कंपनीचे आरोग्य सल्लागार अजय चव्हाण व टीम एजे माणगाव यांच्यातर्फे माणगाव तालुक्यातील विविध शाळांमधील सर्व विद्यार्थ्यांना मंगळवार दि.१ जुलै २०२५ रोजी वह्या वाटप करण्यात आले.

या वेळी तालुक्यातील केंद्र उतेखोल येथील रायगड जिल्हा परिषद शाळा नाणोरे, कळमजे, बामणोली आदी शाळांतील सर्व विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आल्या. या कार्यक्रमास उतेखोल केंद्राचे केंद्रप्रमुख शंकर शिंदे, नाणोरे शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वाटवे, सहशिक्षिका वनिता डोळस, कळमजे शाळेचे मुख्याध्यापक सुदर्शन भागवतराव वाघोरकर, सहशिक्षिका सीमा भांड, बामणोली शाळेच्या मुख्याध्यापिका सुधा मोरे, सहशिक्षिका वैशाली पवार, सुप्रिया कडवेकर, जान्हवी कुशवाह, गणेश दबडे, शिवानी सावंत, महेंद्र शिगवण,वर्षा साखरे, आशा पवार, अमिता बारटक्के, मंदा उभारे, मानसी चव्हाण, सुदर्शन ढोंबरे, अक्षय काणसे, ओम मोरे, सर्व शाळेतील शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, ग्रामस्थ, पालक वर्ग आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## भाजपच्या प्रवीण सकपाळ यांच्यातर्फे विद्यार्थ्यांना मोफत वह्यावाटप

**नेरळ : प्रतिनिधी**



भारतीय जनता पक्ष माथेरान शहर अध्यक्ष प्रवीण सकपाळ यांच्या विशेष प्रयत्नातून बेस्ट शिव हनुमान मंदिर ट्रस्ट मुंबई या संस्थेच्या माध्यमातून येथील तीनही शाळांना बुधवारी (दि.२) वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक विद्यामंदिर, प्रा.शांताराम यशवंत गव्हाणकर विद्यामंदिर आणि सेंट झेविअर हायस्कुल या तिन्ही शाळांच्या विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला.बेस्ट शिव हनुमान मंदिर ट्रस्ट मुंबई या संस्थेच्या माध्यमातून एकूण शंभर डझन वह्या प्राप्त झाल्या होत्या.

या वेळी भाजप अध्यक्ष प्रवीण सकपाळ, माजी उप नगराध्यक्ष चंद्रकांत जाधव, शैलेश चाफेरकर,विजय चौधरी, सुभाष भोसले, अमुघन, महिला आघाडीच्या सुहासिनी शिंदे यांसह भाजपचे अन्य कार्यकर्ते उपस्थित होते. गावातील सर्वसामान्य गरजवंत नागरिकांसाठी, शालेय विद्यार्थ्यांसाठी नेहमीच सहकार्याची भूमिका भाजपच्या वतीने पार पाडली जात आहे. सर्व विद्यार्थ्यांना वह्या मिळाल्यामुळे प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता.

या वेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष ज्योती शिंदे, मुख्याध्यापक दिलीप आहिरे, लक्ष्मण ढेबे, सचिन भोईर, संतोष चाटसे, अमोल अंधारे, साक्षी कदम, निकीता चव्हाण, मनिषा चौधरी, माधुरी चौधरी आदी शिक्षक उपस्थित होते.

## माणगाव बौद्ध समाज समन्वय समितीतर्फे भीमरत्न पुरस्कार

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुका बौध्दसमाज समन्वय समिती इयत्ता दहावी, बारावी तसेच पदवीका,पदवी उतीर्ण विद्यार्थ्यांचा गुणगौरव व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना 'भिमरत्न' हा पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले.

या वेळी जिजाऊ,सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतीमेला पुष्पहार अर्पण करून त्रिशरण पंचशिला घेऊन हा कार्यक्रम चालू करण्यात आला.यावेळी माणगांव तालुक्यातील तमाम बौध्द समजाचे पदाधादिकारी, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी वर्ग उपासक, उपासिका हे मोठ्या संख्येने उपस्थित होते. दहावी, बारावी तसेच पदविका व पदवी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना एक फाईल, सन्मान चिन्ह तसेच सेवानिवृत्त कर्मचारी तसेच या कार्यक्रमाला उपस्थित प्रमुख पाहुण्यांना 'भिमरत्न' पुरस्कार देऊन त्याचा सत्कार करून सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाला माणगांव तालुक्यातील एक अभ्यासू व दानशूर व्यक्तीमत्व तसेच नामवंत युवा उद्योजक नरेश अहिरे, बहुजन हितकरी सभेचे अध्यक्ष रविंद्र जाधव, मा.बाजार समिती सभापती नाडकर, कोषाध्यक्ष सुर्यकांत कासे गुरूजी, सचिव ॲड.राकेश मोरेसह कोषाध्यक्ष संतोष कासारे, उपाध्यक्ष अमोल मोहिते, किरण शेलार, रमेश घोगरे, मधूकर सकपाळ सर, योजना लोखंडे हे समन्वय समितीचे पदाधिकारी तसेच विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## काव्यगंगा पुस्तकाचा प्रकाशन सोहळा

**मुरूड : प्रतिनिधी**

आगरी समाज ऊत्कर्ष मंडळ, मजगाव, मुंबई मंडळाचे अध्यक्ष कवी आनंदीनंदन अनंत धर्मा भोईर यांनी लिहिलेल्या काव्य गंगा या काव्य संग्रहाचा पुस्तक प्रकाशन सोहळा, वरद सभाग्रुह, दुसरा मजला, गणेश मंदिर डोंबिवली पूर्व येथे नुकताच संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आगरी समाज विकास संघ, मुंबई मंडळाचे अध्यक्ष गजानन रामभाऊ पाटील होते आणि प्रमुख अतिथी म्हणून आदर्श अग्रसेन मासिकाचे संपादक, आगरी भाषेचे बादशहा चंद्रकांत नारायण पाटील उपस्थित होते. त्याच प्रमाणे साहित्यीक हृदयनाथ पाटील, कवी सुनील पाटील गुरुजी, कवी जयंत पाटील, कवी नमाई सूभाष नाईक, कवी संदेश भोईर, श्री हरी दळवी उपस्थित होते. प्रथमता कवी आनदीनंदन अनंत भोईर यांच्या पत्नी प्रिती अनंत भोईर आणि स्नुशा निलम अभिनय भोईर यांनी सर्व उपस्थित मान्यवरांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

विशेष म्हणजे सदर कार्यक्रमाला राहुल कामत उपस्थित राहीले होते. कार्यक्रमासाठी आगरी समाज ऊत्कर्ष मंडळ, मजगाव., मूंबई मंडळाचे खजिनदार मंगेश कांबळी, मंडळाचे सदस्य म्हणून राजु भाऊ दिवेकर, विनोद भाऊ तांबडकर, सदाभाऊ धसाडे हजर होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निरूपणकार तसेच स्वर साधना कराओके म्युझिकल ग्रूपचे संचालक राजेश पवार यानी केले.




## रोहा अष्टमी येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा येथील परम पूज्य पांडुरंग शास्त्री आठवले मराठी शाळा, अष्टमी क्र. ३ येथे प्रसाद खुले यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना गणवेश व वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले.

ही उपक्रम रोहा परिषद शिक्षण मंडळाच्या अंतर्गत राबवण्यात आली. या वेळी कार्यक्रमाला केंद्र प्रमुख लाडे सर, अष्टमी गावचे माजी अध्यक्ष नितीन सदावर्ते, अष्टमी ग्रामस्थ मंडळाचे खजिनदार प्रसाद खुळे, दत्तात्रेय शेडगे, हरेश पिंपळे माजी मुख्याध्यापका देशमुख मॅडम शाळेच्या मुख्याध्यापिका नम्रता पानसरे मॅडम व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री शिलधनकर, उपाध्यक्ष रविना कडू, विद्यार्थी आणि इतर मान्यवर मंडळी व अधिकारी वर्ग उपस्थित होते.




**पेण नगरपरिषद, पेण**

**जाहीर ई- निविदा सूचना क्र -०६ सन २०२५-२६**

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | इसारा रक्कम रु. | निविदा फॉर्म फी रु. | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | पेण नगरपरिषद हद्दीतील आंबेडकर शाळा क्र. ०४ ची दुरुस्ती करणे. | ११,७६,६४४/- | ११,७६६/- | १५००/- | १८० दिवस |
| २ | पेण नगरपरिषद हद्दीतील कासार तलाव (आंबेडकर चौक) शौचालय बांधणे | १६,१४,५२०/- | १६,१४५/- | १५००/- | १८० दिवस |

पेण नगरपरिषद हद्दीतील बांधकाम विभागाकडील कामाची जाहिर ई निविदा सूचना -शासनाच्या www. mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली असून सदर कामी ई - निविदा दिनांक ०४/०७/२०२५ ते १४/०७/२०२५ या कालावधीमध्ये ऑनलाईन स्विकारणेत येतील.

जा.क्र.पेनप/का.४/बां.वि/२०२५/१०५४
पेण नगरपरिषद कार्यालय
दिनांक :- ३/७/२०२२५

सही XXX
मुख्याधिकारी
पेण नगरपरिषद, पेण



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे-मोहो, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भूमापन नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ३१/२ | १-०६-०० <br> ०-३१-०० <br> एकूण १-३७-०० <br> पैकी ०-४०-०० | १.०० | रजनी जगदिप सेहगल <br> अंकिता जगदिप सेहगल |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. ०३/०७/२०२५

सही/-
ॲड. प्रशांत अशोक भुजबळ
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल.
मो.क्र. : ९९३०३६९८६१

# शुबमन गिलचे विक्रमी द्विशतक

## दुसऱ्या कसोटीत भारत पाचशे पार; जडेजाचे अर्धशतक

**बर्मिंगहॅम : वृत्तसंस्था**

इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात भारतीय संघाचा नवा कर्णधार शुबमन गिलने नवा इतिहास रचला आहे. बर्मिंगहॅम कसोटी सामन्यातील पहिल्या डावात त्याने द्विशतक झळकावले आहे. इंग्लंडच्या मैदानात लीटल मास्टर सुनील गावसकर आणि राहुल द्रविड यांच्यानंतर द्विशतक झळकवणारा तो भारताचा तिसरा फलंदाज ठरला आहे. याआधी पहिल्या कसोटी सामन्यात त्याने शतकी खेळी केली होती.

या द्विशतकी खेळीसह शुबमन गिलने टीम इंडियाचा माजी कर्णधार मोहम्मद अझरुद्दीन याचा विक्रम मागे टाकला आहे. गिल हा सेना देशांत (दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया) द्विशतकी खेळी करणारा पहिला भारतीय कर्णधार ठरला आहे. १९९०मध्ये ऑकलंडच्या मैदानात भारतीय संघाचे नेतृत्व करताना अझरुद्दीन याने १९२ धावांची खेळी केली होती. ही सेना देशांत भारतीय कसोटी संघाच्या कर्णधाराने केलेली सर्वोच्च धावसंख्या होती. आता गिल टीम इंडियाचा नंबर वन कर्णधार ठरलाय. एवढेच नाहीतर सेना देशांत द्विशतकी खेळी करणारा तो आशियाई देशांतील पहिला कर्णधारही ठरला आहे.



इंग्लंडच्या मैदानात द्विशतकी खेळी करणारा शुबमन गिल हा तिसरा भारतीय फलंदाज आहे. १९७९मध्ये ओवलच्या मैदानात लिटल मास्टर सुनील गावसकर यांनी २२१ धावांची खेळी केली होती. ओवलच्या मैदानातच २००२च्या इंग्लंड दौऱ्यात राहुल द्रविडच्या भात्यातून २१७ धावांची खेळी पहायला मिळाली होती. या दिग्गजांच्या यादीत आता गिलने एन्ट्री मारली आहे. एवढेच नाही गावसकरांना मागे टाकत इंग्लंडच्या मैदानातील सर्वोच्च धावसंख्या उभारण्याचा विक्रमही आता त्याच्या नावे झाला आहे.

इंग्लंड दौऱ्यासाठी शुबमन गिलवर कर्णधारपदाची जबाबदारी सोपवल्यावर अनेक प्रश्न निर्माण झाले होते, कारण इंग्लंडमध्ये त्याचा रेकॉर्ड एकदम खराब होता. रोहित शर्मा विराट कोहली या दिग्गजांच्या अनुपस्थितीत इंग्लंडमधील चॅलेंज आणि नव्या जबाबदारीसह फलंदाजीतील रेकॉर्ड सुधारण्याचे चॅलेंज घेऊन त्याने इंग्लंड दौऱ्याला सुरुवात केली. पहिल्या कसोटी सामन्यातील पहिल्या डावात पहिल्यांदाच चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करताना त्याने १४७ धावांची खेळी केल्याचे पहायला मिळाले. त्यानंतर आता दुसऱ्या कसोटी सामन्यातील पहिल्या डावात द्विशतकी खेळीसह त्याने सर्वोत्तम खेळीचा सिलसिला कायम ठेवला आहे.

दरम्यान, गिलचे द्विशतक आणि यशस्वी जैस्वाल, रवींद्र जडेजा यांच्या अर्धशतकांच्या जोरावर भारताने पहिल्या डावात पाचशे धावसंख्येचा पल्ला पार केला आहे. जैस्वालनंतर जडेजाचेही शतक थोडक्यात हुकले. तो ८९ धावांवर बाद झाला.

# फिफा क्लब वर्ल्डकपमध्ये रियल माद्रिद उपांत्यपूर्व फेरीत

## युव्हेंटसवर निसटत्या फरकाने मात; गोंझालो गार्सियाचा गोल निर्णायक

**फ्लोरिडा : वृत्तसंस्था**

स्टार खेळाडू किलियन एम्बाप्पेच्या पुनरागमनाने उत्साहित रियल माद्रिदने फिफा क्लब वर्ल्डकपमध्ये बलाढ्य युव्हेंटसला १-०ने पराभूत करत उपांत्यपूर्व फेरीत दिमाखात प्रवेश केला. सामन्याच्या उत्तरार्धात गोंझालो गार्सियाने केलेला हेडरवरील गोल सामन्यात निर्णायक ठरला. येथील हार्ड रॉक स्टेडियमवर झालेल्या अटीतटीच्या सामन्यात रियल माद्रिदने मारलेली ही बाजी सनसनाटी ठरली.

पहिल्या हाफमध्ये दोन्ही संघांमध्ये चुरशीची लढत रंगली. युव्हेंटसने सुरुवातीला आक्रमक खेळ करत रियल माद्रिदच्या बचावफळीवर दडपण आणण्याचा प्रयत्न केला, मात्र रियलचा गोलरक्षक थिबॉट कोर्टुआने काही उत्कृष्ट बचाव करत त्यांचे प्रयत्न अयशस्वी ठरवले. यानंतर रियल माद्रिदने सामन्यावर हळूहळू पकड मिळवली. ज्युड बेलिंगहॅम आणि फेडेरिको व्हॅल्व्हर्डे यांनी युव्हेंटसच्या गोलपोस्टवर जोरदार हल्ले चढवले, पण त्यांना यश आले नाही.



दुसऱ्या सत्रात रियल माद्रिदने आपले वर्चस्व कायम ठेवले. अखेर सामन्याच्या ५४व्या मिनिटाला त्यांना यश मिळाले. ट्रेंट अलेक्झांडर-अर्नोल्डने दिलेल्या अचूक क्रॉसवर गोंझालो गार्सियाने शानदार हेडर मारत चेंडूला जाळीचा रस्ता दाखवला आणि संघाला १-० अशी महत्त्वाची आघाडी मिळवून दिली.

या सामन्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे रियल माद्रिदचा हुकमी एक्का किलियन एम्बाप्पे याचे आजारपणातून सावरून मैदानात झालेले पुनरागमन. सामन्याच्या ६८व्या मिनिटाला तो बदली खेळाडू म्हणून मैदानात उतरला, तेव्हा उपस्थित ६२ हजारांहून अधिक प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्याचे स्वागत केले.

झाबी अलोन्सोच्या मार्गदर्शनाखाली खेळणाऱ्या रियल माद्रिदने सांघिक खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करत स्पर्धेत आपली घोडदौड कायम ठेवली. यानंतर रियल माद्रिदचा उपांत्यपूर्व सामना आता बोरुसिया डॉर्टमंड आणि मेक्सिकोच्या मॉन्टेरी यांच्यातील विजेत्या संघाशी होईल.

# वैभव सूर्यवंशीची इंग्लंडमध्ये पुन्हा विस्फोटक खेळी

**लंडन : वृत्तसंस्था**

भारताच्या सिनियर संघाबरोबर भारताचा अंडर-१९ संघही इंग्लंड दौऱ्यावर उत्कृष्ट कामगिरी करत आहे. अंडर-१९ संघाचा १४ वर्षीय फलंदाज वैभव सूर्यवंशीने पुन्हा एक विस्फोटक खेळी करत चौकार-षटकारांची आतिषबाजी केली आहे. तिसऱ्या वनडे सामन्यात वैभव सूर्यवंशीने वादळी फलंदाजी करत एक विक्रमही आपल्या नावे केला आहे.

भारत आणि इंग्लंडच्या अंडर-१९ संघांमध्ये खेळल्या जाणाऱ्या एकदिवसीय मालिकेतील तिसऱ्या सामन्यात वैभवने आपला वादळी फलंदाजी करण्याचा सिलसिला सुरूच ठेवला. वैभवने फक्त २० चेंडूत तुफानी अर्धशतक झळकावले, पण अवघ्या काही धावांनी वैभवचे शतक हुकले. वैभवने त्याच्या विस्फोटक खेळीत नऊ षटकार लगावले आहे.

वैभवला पहिल्या दोन सामन्यांमध्ये अर्धशतकाच्या जवळ येऊन बाद झाल होता, पण या सामन्यात त्याने ही कसर भरून काढली. वैभवने २० चेंडूत चार चौकार आणि पाच षटकारांसह आपले अर्धशतक पूर्ण केले. त्यने अवघ्या सहाव्या षटकात पन्नास धावांचा टप्पा गाठला. यासह वैभव सूर्यवंशीने अंडर-१९ वनडेमध्ये सर्वात जलद अर्धशतक करणारा दुसरा खेळाडू ठरला आहे. फक्त ऋषभ पंतने आजवर अंडर-१९मध्ये १८ चेंडूत सर्वात जलद अर्धशतक केले आहे.

# फुटबॉलपटूचा अपघाती मृत्यू

**माद्रिद : वृत्तसंस्था**

लिवरपूल संघातून खेळणाऱ्या पोर्तुगालच्या स्टार फुटबॉलपटूचा रस्ते अपघातात मृत्यू झाला आहे. त्याच्या मृत्यूने फुटबॉल प्रेमींवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. धक्कादायक बाब म्हणजे अवघ्या १० दिवसांपूर्वीच त्याचे लग्न झाले होते.

डिओगो जोटा याच्या कारला स्पेनमध्ये अपघात झाल्याचे सांगितले जात आहे. त्याच्यासोबत त्याचा भाऊ आंद्र होता. तोदेखील फुटबॉलर आहे. जोटाने १० दिवसांपूर्वीच त्याची गर्लफ्रेंड रुटे कार्डोसोसोबत पोर्टोमध्ये लग्न केले होते. २२ जूनला त्याचे लग्न झाले आणि झमोरा येथे त्याच्या कारला अपघात झाला आहे. नेशन्स लीग स्पर्धेत पोर्तुगालने अंतिम फेरीत स्पेनला हरवून विजेतेपद पटकावले होते. नुकत्याच झालेल्या या स्पर्धेत जोटा हा विजेत्या संघात होता.

# यशस्वी जैस्वालने मोडला ५१ वर्षांपूर्वीचा विक्रम

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा सलामीवीर फलंदाज यशस्वी जैस्वालने इंग्लंडविरुद्धच्या चालू मालिकेत उत्कृष्ट फॉर्म कायम ठेवला आहे. एजबॅस्टन येथे सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटीच्या पहिल्या डावात त्याने ८७ धावांची महत्त्वपूर्ण खेळी साकारली. हे त्याच्या कसोटी कारकिर्दीतील ११वे अर्धशतक ठरले, मात्र त्याचे सहावे कसोटी शतक थोडक्यात हुकले.

जैस्वालने आपला उत्कृष्ट फॉर्म कायम ठेवत एजबॅस्टनच्या मैदानावर इंग्लिश वेगवान गोलंदाजांविरुद्ध आक्रमक शैलीत धावा जमवल्या. या भारतीय सलामीवीराने केवळ ५९ चेंडूंत आपले अर्धशतक पूर्ण केले. त्याने करुण नायरच्या (३१) साथीने दुसऱ्या गड्यासाठी ८० धावांची भागीदारी रचली. सामन्याच्या पहिल्या दिवसाच्या दुसऱ्या सत्रात जैस्वाल १०७ चेंडूंत ८७ धावा करून



बाद झाला. बेन स्टोक्सने त्याला आपल्या गोलंदाजीचा बळी ठरवले.


जैस्वालचे शतक हुकले असले तरी त्याने ५१ वर्षांपूर्वीचा जुना विक्रम मोडीत काढला. तो बर्मिंगहॅममध्ये सर्वाधिक धावा करणारा भारतीय सलामीवीर ठरला आहे. यापूर्वी हा विक्रम सुधीर नायक यांच्या नावावर होता. त्यांनी १९७४मध्ये ७७ धावा केल्या होत्या. या मैदानावर अर्धशतक फटकावणारा जैस्वाल पाचवा भारतीय सलामीवीर ठरला. यासह तो दिग्गज सुनील गावसकर आणि चेतेश्वर पुजारा यांच्या क्लबमध्ये दाखल झाला.

यशस्वी जैस्वालच्या आधी बर्मिंगहॅममध्ये भारताकडून सलामीला सुधीर नायक, सुनील गावस्कर, चेतेश्वर पुजारा आणि चेतन चौहान यांनी अर्धशतके झळकावली आहेत. गावसकर यांच्याकडे सर्वाधिक तीन अर्धशतके आहेत. इतर सर्व फलंदाजांनी प्रत्येकी एक अर्धशतक केले आहे. सुधीर नायक यांच्या ७७, गावसकर यांच्या ६८, पुजाराच्या ६६, चेतन चौहान यांच्या ५६ धावा या सर्वाधिक धावा आहेत. भारताचे प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी २०२२मध्ये ३८ धावांची खेळी खेळली.

# सापाने थांबवला सामना!

**कोलंबो : वृत्तसंस्था**

कोलंबोतील आर. प्रेमदासा स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या पहिल्या सामन्यात यजमान संघाने शानदार विजय मिळवला. या विजयासह श्रीलंकेने एकदिवसीय मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. या सामन्यादरम्यान एक विचित्र घटना घडली, ज्यामुळे मैदानात उपस्थित सर्वांना धक्का बसला.



पहिल्या एकदिवसीय सामन्यात कर्णधार चारिथ असलंकाच्या शानदार शतकामुळे (१०६ धावा) श्रीलंकेने २४४ धावा केल्या. लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी बांगलादेशी फलंदाज मैदानात आले. बांगलादेशच्या डावादरम्यान तिसऱ्या षटकात एक साप मैदानात घुसला. त्यामुळे मैदानात प्रचंड गोंधळ उडाला. असिता फर्नांडो गोलंदाजी करत होता. सापाला पाहून सर्वच खेळाडू घाबरले. त्यामुळे सामना काही काळ थांबवावा लागला. त्यानंतर सुरक्षा कर्मचाऱ्यांनी कसा तरी सापाला मैदानाबाहेर हाकलून लावले. सोशल मीडियावर या घटनेची तुफान चर्चा रंगली आहे.

गेल्या वर्षी आर. प्रेमदासा स्टेडियमवरच श्रीलंका प्रीमियर लीगच्या काही सामन्यांदरम्यान साप मैदानात घुसला होता. त्यामुळे खेळ काही काळ थांबवावा लागला होता.

# कर्णधार केशव महाराज दुखापतग्रस्त

## वियान मुल्डरकडे दक्षिण आफ्रिका संघाची धुरा

**बुलवायो : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेचा संघ सध्या झिम्बाब्वेच्या दौऱ्यावर असून दोन कसोटी सामन्यांची मालिका खेळत आहे. या मालिकेतील दुसरा आणि अंतिम सामना ६ जुलैपासून बुलावायो येथे खेळवला जाणार आहे, मात्र या महत्त्वपूर्ण सामन्यापूर्वीच दक्षिण आफ्रिलेच्या संघाला मोठा धक्का बसला आहे. संघाचा प्रमुख फिरकी गोलंदाज केशव महाराज दुखापतीमुळे दुसऱ्या कसोटीतून बाहेर पडला आहे.

मांडीतील स्नायू दुखावल्यामुळे महाराज दुसरा कसोटी सामना खेळू शकणार नाही. त्याच्या जागी संघात सेनुरन मुथुसामीचा समावेश करण्यात आला असून त्याने आतापर्यंत दक्षिण आफ्रिकेसाठी चार कसोटी सामने खेळले आहेत. महाराजच्या अनुपस्थितीत अष्टपैलू खेळाडू वियान मुल्डर संघाचे नेतृत्व करेल. विशेष म्हणजे, गेल्या



तीन कसोटी सामन्यांमधील तो दक्षिण आफ्रिकेचा तिसरा कर्णधार असेल.

जून महिन्यात लॉर्ड्सवर ऑस्ट्रेलियाविरुद्ध झालेल्या जागतिक कसोटी अजिंक्यपद अंतिम सामन्यात टेंबा बावुमाच्या नेतृत्वाखाली दक्षिण आफ्रिकेने पाच गडी राखून विजय मिळवला होता. त्यानंतर झिम्बाब्वेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात केशव महाराजने संघाचे कर्णधारपद भूषवले आणि संघाने ३२८ धावांनी दणदणीत विजय नोंदवला. आता झिम्बाब्वेविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीत वियान मुल्डर संघाची धुरा सांभाळणार आहे. त्याच्या नेतृत्वाखाली चॅम्पियन असणारा द. आफ्रिकेचा संघ कशी कामगिरी करतो हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

झिम्बाब्वेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात केशव महाराजने एक ऐतिहासिक कामगिरी केली. त्याने आपल्या कसोटी कारकिर्दीतील २०० बळींचा टप्पा पूर्ण केला. बळींचे द्विशतक पूर्ण करणारा तो द. आफ्रिकेचा पहिलाच फिरकी गोलंदाज ठरला. यापूर्वी ज्या आठ गोलंदाजांनी हा टप्पा ओलांडला होता, ते सर्व वेगवान गोलंदाज होते. महाराजने त्याच्या ५९ कसोटी सामन्यांच्या कारकिर्दीत २०३ बळी घेतले आहेत, ज्यात त्याने ११ वेळा एका डावात पाच बळी आणि एकदा सामन्यात दहा बळी घेण्याचा पराक्रम केला आहे.

# जोकोविचचा पुष्पा अवतार

**लंडन : वृत्तसंस्था**

विम्बल्डनने इन्स्टाग्राम अकाउंटवरून स्टार टेनिसपटू नोवाक जोकोविचचा पुष्पा अवतारातील एक फोटो शेअर केला आहे. या पोस्टरमध्ये पुष्पा चित्रपटाच्या शीर्षकाच्या फॉन्टमध्ये जोकोविच याचे नाव तेलगुमध्ये लिहिले आहे. या पोस्टरच्या कॅप्शनमध्ये रुकेगा भी नहीं और झुकेगा भी नहीं, असे कॅप्शन देण्यात आले.



अल्लू अर्जुनचा पुष्पा : द राईज हा चित्रपट २०२१मध्ये प्रदर्शित झाला. त्यानंतर या चित्रपटाचा दुसरा भाग पुष्पा द रूल गेल्या वर्षी म्हणजेच २०२४मध्ये प्रदर्शित झाला. या चित्रपटाच्या पहिल्या आणि दुसऱ्या भागाने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला. हा चित्रपट कन्नड व्यतिरिक्त हिंदीसह इतर भाषांमध्ये प्रदर्शित झाला. या चित्रपटातील 'पुष्पा, पुष्पा राज... झुकेना नही...' हा डायलॉग भारतासह जगभरात प्रसिद्ध झाला.

या पोस्टरवर नेटकऱ्यांच्या प्रतिक्रिया येत आहेत. एका व्यक्तीने म्हटले आहे की, विम्बल्डन भारतात लोकप्रिय करण्यासाठी हा प्लान असू शकतो. दुसऱ्याने म्हटले, अल्लू अर्जुनचे जगभरात चाहते आहेत.





पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि भारतीय जनता पक्ष उलवे नोड-२ यांच्या वतीने रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये मोफत वह्या वाटपाचा कार्यक्रम बुधवारी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास 'रयत'च्या मॅनेजिंग कौन्सिलचे ज्येष्ठ सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, जनरल बॉडी सदस्य जे.एम. म्हात्रे, वाय.टी. देशमुख, महेंद्र घरत, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष, गव्हाण विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन तथा 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत आदी मान्यवर उपस्थित होते.

जीवेत् शरदः शतम्!
तिलक टंडन
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक
रोमन बर्मन, मिलिंद कोळी

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com